रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक १५७
www.ramprahar.com

सोमवार, २३ डिसेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

कोलाडला धावती बस पेटली; सुदैवाने प्रवासी बचावले/२

पेणमध्ये अनधिकृत भंगार गोदामावर पोलिसांचा छापा/५

नवी मुंबई मॅरेथॉनमध्ये अक्षय, सुजाता अव्वल/८

## पंतप्रधान मोदींना कुवेतमधील सर्वोच्च नागरी पुरस्कार



**कुवेत सिटी** : कुवेतच्या दौऱ्यावर गेलेले भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तेथील अमीर शेख मेशल अल-अहमद अल-जाबेर अल सबा यांच्याकडून रविवारी (दि. २२) 'द ऑर्डर ऑफ मुबारक द ग्रेट' हा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी कुवेतमधील बायन पॅलेसमध्ये पंतप्रधान मोदींना औपचारिक गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला. पंतप्रधान मोदींनी कुवेतचे अमीर शेख मेशल अल-अहमद अल-जाबेर अल सबा यांच्याशी विस्तृत चर्चा केली. या चर्चेत भारत-कुवेत संबंधांना नवीन गती देण्यावर भर देण्यात आला आहे. विशेषत: व्यापार, गुंतवणूक आणि ऊर्जा क्षेत्रात परस्पर गुंतवणूक आणि व्यापारावर चर्चा झाली. चार दशकांतील भारतीय पंतप्रधानांची ही पहिलीच कुवेत भेट आहे.

# 'पालकमंत्र्यांसंदर्भात लवकरच निर्णय'

**मुंबई : प्रतिनिधी**

महायुतीला बहुमत मिळाल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची, तर अजित पवार व एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. यानंतर १५ डिसेंबरला राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार पार पडला. नागपूरमध्ये हिवाळी अधिवेशनाची सांगता होताच शनिवारी रात्री उशिरा खातेवाटपही करण्यात आले. आता पालकमंत्रिपदांचे वाटप कधी होणार याकडे सर्वांचे लक्ष आहे. यावर शिवसेना नेते आणि पर्यटनमंत्री शंभुराज देसाई यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

महायुतीमधील आमच्या तीनही पक्षात मंत्रिपदावरून कोणतीही रस्सीखेच नव्हती तसेच पालकमंत्रिपदावरून आमची कोणतीही रस्सीखेच नाही. येत्या दोन दिवसांत पालकमंत्रिपदाचे वाटप होईल. आम्ही हातात हात घालून चांगले काम करू, असे मंत्री शंभुराज देसाई म्हणाले.

प्रत्येकाला वाटते की, आपल्याला जिल्ह्याचे पालकमंत्रीपद मिळावे, पण याचा सर्वस्वी निर्णय आमचे नेते घेतील. एक-दोन दिवसात मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री यांची बैठक होईल. त्या वेळी पालकमंत्र्यांसंदर्भात निर्णय होईल, असेही देसाई यांनी सांगितले.

या वेळी मंत्री देसाई यांना मुंबई महापालिकेच्या निवडणुकीबद्दल प्रश्न विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले, शिवसेना ठाकरे पक्ष इतक्या बॅकफूटवर गेला आहे की, ते एकमेकांच्या माथ्यावर खापर फोडण्याचे काम करत आहेत. काँग्रेस म्हणते काय करायचे ते करू द्या, राष्ट्रवादी म्हणते आम्हीदेखील वेगळे लढू. विधानसभेत या तिन्ही पक्षांचे एकमत नसल्याचे दिसून आले. विधानसभा निवडणुकीत त्यांना जे अपयश आले, त्यामुळे त्यांचे त्यांना कळेना. मुंबई महापालिकेसाठी आमचं ठरलंय. महायुतीचा झेंडा फडकवायचा. तिघांच्या नेतृत्वाखाली मुंबईत आमचा झेंडा फडकलेला दिसेल.

दरम्यान, खातेवाटप झाल्यानंतर बहुसंख्य मंत्र्यांनी मतदारसंघात जाणे पसंत केले. अनेक मंत्री मतदारसंघात परतले असून ठिकठिकाणी जंगी स्वागत करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अहिल्यानगरचा दौरा केला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे त्यांच्या सातारा जिल्ह्यातील दरे गावात पोहचले. उपमुख्यमंत्रिपद मिळाल्यानंतर प्रथमच ते त्यांच्या मूळ गावी आले आहेत. त्यांच्यासोबत खासदार श्रीकांत शिदे हेदेखील दरे गावी पोहचले. शिंदेंचा हा दौरा तीन दिवसांचा असून या दरम्यान ते विश्रांती घेणार असल्याचे त्यांच्या निकवर्तीयांकडून सांगितले जात आहे.

उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवारदेखील आपल्या बारामती मतदारसंघात परतले आहेत. त्यांनी पहाटेपासून बारामती मतदारसंघातील विविध विकासकामांचा आढावा घेतला.

# मंत्री भरत गोगावले यांचे पनवेलमध्ये जोरदार स्वागत

### आमदार प्रशांत ठाकूर, महेश बालदी यांच्याकडून शुभेच्छा



**पनवेल : वार्ताहर**

शिवसेनेचे महाडमधील आमदार भरत गोगावले यांच्या गळ्यात अखेर कॅबिनेट मंत्रिपदाची माळ पडली. रायगड जिल्ह्याचे प्रवेशद्वार असणाऱ्या पनवेलमध्ये शिवसेनेच्या माध्यमातून त्यांचे रविवारी (दि. २२) जोरदार स्वागत करण्यात आले. या वेळी पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर व उरणचे आमदार महेश बालदी यांनी उपस्थित राहून मंत्रीमहोदयांना शुभेच्छा दिल्या.

शिवसेना उपजिल्हाप्रमुख परेश पाटील व महानगरप्रमुख प्रथमेश सोमण यांच्या पुढाकाराने आयोजित या सत्कार व स्वागत सोहळ्यात कळंबोली सर्कल येथून बाईक व गाड्यांच्या रॅलीने मंत्री भरत गोगावले पनवेल येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आले. येथे शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. डीजे, ब्रास बँडसह जेसीबीमधून फुलांची उधळण करत तब्बल ५० फुटी हार घालून व फटाक्यांच्या आतषबाजीत मंत्री गोगावले यांचे भव्य स्वागत व सत्कार करण्यात आला. पुढे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासदेखील त्यांनी मानवंदना दिली.

या सोहळ्यास भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, माजी नगरसेवक अजय बहिरा, मुकीद काझी, प्रभाकर बहिरा, उपजिल्हाप्रमुख परेश पाटील, पनवेल महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, भाजप जिल्हा चिटणीस अमरीश मोकल, रूपेश धुमाळ, प्रकाश खैरे, अमित ओझे, सतिश पाटील, केदार भगत, महेश पाटील, राकेश गायकवाड, समीर केणी, विद्याधर मोकल आदी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी जशी रयतेची सेवा केली तशीच सेवा करण्याची प्रेरणा मंत्री भरत गोगावले यांना मिळो, अशा शुभेच्छा आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी दिल्या. पुढे शिरढोण येथे आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या स्मारकास अभिवादन करून मंत्रीमहोदय त्यांच्या महाड मतदारसंघाकडे रवाना झाले.




(छाया : प्रफुल्ल कांबळे)

**उलवे नोड : रामबागचा वर्धापन दिन रविवारी न्हावेखाडी येथे उत्साहात साजरा झाला. या सोहळ्यास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, कामगार नेते महेंद्र घरत आदी उपस्थित होते. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा सत्कार करण्यात आला. (वृत्त उद्याच्या अंकात)**

## मुख्यमंत्र्यांनी घेतली अण्णा हजारेंची भेट



**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी (दि. २२) ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांची भेट घेतली. भाजप नेते व जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील उपस्थित होते.

या वेळी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करत त्यांना राळेगणसिद्धी येथे येण्याचे आमंत्रण दिले.

## निवडक

### अभिनेता अल्लू अर्जुनच्या घरावर दगडफेक, सहा जण ताब्यात

**हैदराबाद** : दाक्षिणात्य अभिनेता अल्लू अर्जुनच्या हैदराबाद येथील घरावर विद्यापीठाच्या संयुक्त कृती समितीच्या (जेएसी) सदस्यांनी दगडफेक केली. त्यांनी संध्या थिएटरमध्ये झालेल्या चेंगराचेंगरी प्रकरणातील मृत महिलेच्या कुटुंबीयांना एक कोटी रुपयांची भरपाई देण्याची मागणी केली. तेव्हा अल्लू घरी उपस्थित नव्हता. या प्रकरणी पोलिसांनी सहा जणांना ताब्यात घेतले आहे.

### दिल्ली पोलिसांकडून १७५ बांगलादेशी नागरिक ताब्यात

**नवी दिल्ली** : उपराज्यपालांच्या आदेशानंतर दिल्ली पोलिसांनी गेल्या काही दिवसांपासून रोहिंग्या आणि बांगलादेशींविरोधात धडक मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेंतर्गत १७५ संशयित बांगलादेशींना दिल्लीबाहेरील जिल्ह्यातून ताब्यात घेण्यात आले आहे. दरम्यान, ज्यांच्याकडे भारतीय कागदपत्रे नाहीत त्यांना ताब्यात घेऊन कायदेशीर प्रक्रियेद्वारे बांगलादेशला परत पाठवण्याची तयारी सुरू असल्याचे पोलिसांनी म्हटले आहे.

# थंडीचा जोर काहीसा ओसरतोय

### किमान तापमानात वाढ; पुन्हा पावसाची शक्यता

**नागपूर : प्रतिनिधी**

राज्यात डिसेंबरच्या पूर्वार्धात कडाक्याची थंडी पडली. गोठवणाऱ्या थंडीमुळे ठिकठिकाणी शेकोट्या पेटलेल्या दिसून येत होत्या, पण आता या थंडीचा जोर काहीसा ओसरत चालला आहे. राज्यातील किमान तापमानात वाढ झाली असून आता हवामान खात्याने पावसाचीही शक्यता व्यक्त केली आहे.

राज्यात नुकतेच नागपूर येथे हिवाळी अधिवेशन पार पडले. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला नागपुरात सात अंश सेल्सिअस इतके किमान तापमान नोंदवले गेले. तीन ते चार दिवस थंडीचा जोर कायम होता, तर अधिवेशन संपताना अखेरचे दोन दिवस जोर काहीसा ओसरला. आता हवामान खात्याने हा जोर आणखी ओसरणार असल्याचे सांगून पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

बंगालच्या उपसागरात तयार झालेला कमी दाबाचा पट्टा पुढे सरकणार असून पूर्व-इशान्येकडे दाब वाढणार आहे. परिणामी इशान्येकडील राज्यांमध्ये पावसाला पोषक वातावरण तयार झाले आहे. याचाच परिणाम महाराष्ट्राच्या तापमानावरही होणार असून पुढील दोन दिवसांत राज्यात काही भागात पावसाची शक्यता आहे. राज्यातील किमान तापमानात वाढ झाली असून विदर्भात येत्या २४ व २५ डिसेंबरला पावसाच्या हलक्या ते मध्यम सरी पडण्याचा अंदाज आहे. मराठवाडा, मध्य महाराष्ट्रातही आर्द्रता वाढणार असून काही भागात वातावरण ढगाळ राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता कडाक्याच्या थंडीला ब्रेक मिळणार असून तापमानात काहीशी वाढ होणार असल्याचे हवामान विभागाने सांगितले आहे.

# कर्जतमधील साखळी उपोषण अखेर स्थगित

### प्रशासन, पोलीस यंत्रणेकडून समस्या सोडवण्याचे आश्वासन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहर बचाव समितीच्या वतीने विविध मागण्यांसाठी करण्यात येत असलेले बेमुदत साखळी उपोषण शनिवारी (दि. २१) संध्याकाळी सहाव्या दिवशी मागे घेण्यात आले. नायब तहसीलदार, पोलीस निरीक्षक, मुख्याधिकारी तथा प्रशासक यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेऊन काही मागण्या पूर्ण झाल्या आहेत, तर काही येत्या काही दिवसांत पूर्ण होतील, असा शब्द दिल्याने उपोषण स्थगित करण्यात आले.



नायब तहसीलदार सचिन राऊत, पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड, मुख्याधिकारी वैभव गारवे हे उपोषणस्थळी आले. त्यांनी उपोषणकर्त्यांशी सकारात्मक चर्चा केली. या वेळी ॲड. कैलास मोरे, मोहन ओसवाल, राजाभाऊ कोठारी, राजेश लाड, दीपक बेहेरे, विजय हरिश्चंद्रे, मल्हारी माने, हरिश्चंद्र यादव, प्रशांत उगले, दीपक लाड, सुधांशू वनगे, ॲड. महेश घारे, विजय बेडेकर, अनिल मोरे, सतीश मुसळे, स्विटी बार्शी, धर्मेंद्र मोरे, डॉ. प्रशांत सदावर्ते, प्रशांत उगले, उमेश शेट्ये, लोकेश यादव, विद्या वनगे, ॲड. क्रांती अभंगे आदी उपस्थित होते. दुपारच्या वेळेत माजी आमदार सुरेश लाड यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेऊन चर्चा केली.

मुख्याधिकारी गारवे यांनी समितीच्या मागण्या मार्गी लावण्याचा शब्द दिला. पोलीस निरीक्षक गरड यांनी सीसीटीव्हीच्या माध्यमातून बेशिस्त वाहनचालकांना दंड केला जाईल, असे सांगून नागरिकांनीही आपली जबाबदारी पार पाडून सहकार्य करावे, असे आवाहन केले. त्यानंतर ॲड. मोरे यांनी हे साखळी उपोषण स्थगित करण्यात येत असून महिनाभरात काय काय अंमलबजावणी होते ते पाहून पुढील दिशा ठरवली जाईल, असे म्हटले. त्यानंतर अधिकारीवर्गाने उपोषणकर्त्यांना शीतपेय देऊन उपोषण सोडविले.

# रायगडचे समुद्र किनारे पर्यटकांनी फुलले

**अलिबाग : प्रतिनिधी**



रायगड जिल्ह्यात पर्यटन हंगाम जोमात सुरू झाला आहे. शनिवार-रविवारच्या सुट्ट्यांमुळे समुद्र किनाऱ्यांवर पर्यटकांची गर्दी वाढल्याचे दिसून आले, तर आता नाताळच्या सुट्ट्याही सुरू होत असल्याने अलिबाग, मुरूड, दिवेआगर, श्रीवर्धन परिसरातील बहुतांश पर्यटनस्थळे हाऊसफुल झाली आहेत.

रायगडात आलेले पर्यटक किनाऱ्यांवर फिरून झाल्यावर समुद्रस्नानाचा आनंद घेत आहेत. एटीव्ही राईडबरोबरच वेगवेगळ्या वॉटर स्पोर्टस्‌चा मनमुराद आस्वाद घेत आहेत. त्यात बनाना राईटस, जेटसकी, पॅरासेलिंग यांचा समावेश आहे, तर उंटसवारी, घोडागाडी यामुळे बच्चेकंपनी खुश आहे.

वीकेण्डला अलिबागमधील आवास, सासवणे, किहीम, वरसोली, अलिबाग, आक्षी नागाव, चौल आणि रेवदंडा येथे साधारणपणे २० हजार पर्यटक दाखल झाले होते, तर मुरूड तालुक्यातील काशिद, नांदगाव, मुरूड आणि फणसाड येथे १२ हजारांहून अधिक पर्यटक संख्या होती.

### व्यवसाय तेजीत

पर्यटकांच्या आगमानामुळे स्थानिक व्यावसायिकांना रोजगार संधी उपलब्ध झाल्या आहे. बोटींग व्यवसायिक, स्टॉलधारक, नारळपाणी विक्रेते यांचे व्यवसाय तेजीत असल्याचे पहायला मिळाले. नाताळची सुट्टी अवघ्या दोन दिवसांवर आली असताना इथल्या व्यावसायिकांनाही त्याचे वेध लागले आहेत, कारण ३१ डिसेंबरपर्यंत पर्यटक मोठ्या प्रमाणावर येत असतात. त्यामुळे या दरम्यान चांगला रोजगार मिळतो.





# महसूल कायद्यात सुधारणा आवश्यक

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे प्रतिपादन

**नागपूर : प्रतिनिधी**

समाजातील शेवटच्या माणसाशी संबंध असलेल्या महसूली कायद्यात सुधारणा आवश्यक आहे त्यादृष्टीने काम करणार, असल्याचे सांगुन नवनिर्वाचित महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राहुल गांधी यांच्या परभणी दौ-यावर टीका केली



बावनकुळे यांनी नागपुरात प्रसार माध्यमांशी बोलतांना मला महसूल खात्याची जबाबदारी दिली आहे, शेतकरी शेतमजुर व समाजातील शेवटच्या माणसाशी संबंध असलेल्या महसूल खात्यात कायद्यात सुधारणा आवश्यक आहे त्यादृष्टीने काम करणार आहे. आज छोट्या छोट्या कारणामुळे विकास प्रकल्प थांबले आहे. त्याला पुढे नेण्याचे काम करू, ८६ हजार हेक्टर झुडपी जंगल नसताना त्याच्या नोंदी केल्या आहेत. त्याप्रमाणे उच्च न्यायालयात ते प्रकरण सुरू आहे. लवकर झुडपी जंगल मुक्त होईल असे ही सांगितले

विदर्भातील झुडपी जंगल जमिनीमुळे विकास प्रकल्प थांबले आहेत. उच्च न्यालयात महाराष्ट्र सरकारच्या वतीने आम्ही बाजू मांडू. रेती माफिया बंद कसे होईल यासाठी प्रयत्न करणार आहे देशात काय सुलभीकरण झाले हे जनतेला घरी बसून पाहता येईल. जनतेची फरपट थांबेल असा बदल करून जनतेला दिलासा देऊ. महसूल खात्याकडून होणारा त्रास थांबेल असेही बावनकुळे म्हणाले.

पालकमंत्री पदाचा कुठलाही वाद नाही.

१२ जिल्ह्यात मंत्री नसले तरी, ज्या पद्धतीने खातेवाटप झाले त्याच पद्धतीने पालकमंत्री पदाचे वाटप होईल. मस्साजोग येथे संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी गेलेले शरद पवार यांच्या वयानुसार ते वैद्यकीय परिस्थितीमुळे ते सोप्यावर बसले असतील. हा टीका टिपणीचा विषय नाही. महायुतीमध्ये भुजबळ यांचे मोठे स्थान आहे. त्यांच्या राजकीय आयुष्याचा योग्य निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार , प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे निर्णय घेतील असेही बावनकुळे म्हणाले.

### राहुल गांधीचा दौरा नौटंकी

***परभणीत घडलेली घटना ही दुर्दैवी आहे. या घटनेतील आरोपी हा मनोरुग्ण आहे तरी काँग्रेसला या विषयावर राजकारण करायचे आहे. त्यातूनच आता राहुल गांधी यांचा परभणी दौरा म्हणजे केवळ नाटक असल्याची टीका बावनकुळे यांनी केली. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना निवडणुकीत पराभूत करण्याचे काम काँग्रेसने केले . काँग्रेसचे युवराज राहुल गांधी यांचा उद्याचा परभणी दौरा हे केवळ नाटक आहे. महाराष्ट्रातील दलित समाज त्यांना साथ देणार नाही, असेही बावनकुळे म्हणाले.***

# मुंबई-गोवा महामार्गावर कोलाड येथे धावती बस पेटली

## सुदैवाने प्रवासी बचावले, बस जळून खाक

**धाटाव : प्रतिनिधी**

मुंबई गोवा महामार्गावर शनिवारी मध्यरात्री कोलाड नजिक धावती खाजगी प्रवासी बस पेटली.बस मधून प्रवास करणारे प्रवासी सुदैवाने बचावले असून कोणतेही जिवीत हानी झाली नाही परंतु बस पूर्णतः जळून खाक झाल्याची घटना घडली. कोलाड नजिक कोकण रेल्वे पुलाखाली ही भयावह घटना घडली या दरम्यान सुदैवाने कोणती ही रेल्वे गाडी न आल्याने मोठा अनर्थ टळला



मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर रात्रौ बाराच्या सुमारास खासगी प्रवासी वाहतूक बसगाडी क्रमांक एम एच ४७ ए एस ६००३ बोरिवलीहून मालवणच्या दिशेने जात असताना कोलाडनजिक कोकण रेल्वे पुलाजवळ अचानकपणे गाडीच्या पाठच्या बाजूने जोरदार आवाज आला बस चालकाने ताबडतोब बस थांबवली. चालकाचे साथीदाराने तत्काळ उतरून मागे जाऊन तपासले असता गाडीमध्ये आग लागल्याचे निदर्शनात आले. गाडीमध्ये एकूण प्रवास करणाऱ्या तीस प्रवाश्यांना तसेच दोन चालक व दोन कर्मचारी यांना तातडीने खाली उतरवण्यात आले.

या वेळी पोलीस प्रशासन तसेच चंद्रकांत लोखंडे, विनायक लोखंडे, दादा धुमाळ, वनविभागाचे अधिकारी, शिक्षक गर्जे, आशिष वाणी व असंख्य सतर्क नागरिक यांच्या मदतीने सतर्क नागरिकाने सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थेला संपर्क साधला माहिती मिळताच धाटाव औद्योगिक अग्निशमन दल तसेच दीपक नायट्रेट फायर टीम घटनास्थळी दाखल झाली व लागलेल्या आगी वरती नियंत्रण आणण्यात आले. यामध्ये कोणतेही जीवित हानी झाली नाही परंतु गाडीचे फार मोठे नुकसान झाले आहे. काही काळानंतर पोलिसांकडून पुन्हा सुरळीत वाहतूक सुरू करण्यात आली. या घटनेबाबत कोलाड पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# माणगावमध्ये ना. भरत गोगावले यांचे जंगी स्वागत

**माणगाव : प्रतिनिधी**

राज्यात महायुतीची सत्ता स्थापन झाल्यानंतर काही दिवसांपूर्वी मंत्रीमंडळ शपथविधी कार्यक्रम पार पडला. महाड पोलादपूर माणगांवचे आमदार भरत गोगवले यांना रोजगार हमी व फलोत्पादन खाते देण्यात आले. दि. २२ डिसेंबर रोजी ना. गोगावले यांचे माणगांव शहरात जंगी स्वागत करण्यात आले.



माणगाव शहरातील पदाधिकाऱ्यांकडून मुंबई गोवा महामार्गावर मोतीराम प्लाझा ते हॉटेल कोकण क्राऊन अशी जंगी मिरवणूक काढण्यात आली. डी. जे. च्या तालावर शिवसेना पदाधिकारी व अनेक कार्यकर्ते यावेळी ना. गोगावले यांना मंत्री पद मिळाल्याने थिरकताना दिसले. अनेकांनी यावेळी ना. गोगावले यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी युवासेना अध्यक्ष विकास गोगावले, शिवसेना प्रवक्ते ॲड. राजीव साबळे, जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, संपर्क प्रमुख अरुण चाळके,तालुकाप्रमुख ॲड. महेंद्र मानकर, युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे, नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे, नितीन बामुगडे, नगरसेवक सचिन बोंबले, दिनेश रातवडकर, सुनील पवार, विरेश येरूणकर, प्रसाद धारिया आदी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. रविवार असल्याने मिरवणूक दरम्यान मुंबई गोवा महामार्गावर ५ किमी पर्यत वाहतूक कोंडी होऊन लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

# शेकडो शिवप्रेमींनी केली पद्मदुर्गाची स्वच्छता

**मुरुड : प्रतिनिधी**

पद्मदुर्ग जागर व गड संवर्धन संस्थांच्यावतीने रविवारी सकाळी ७.३० वाजता शेकडोच्या संख्येने पद्मदुर्ग किल्ला स्वच्छता मोहीमेला सुरूवात करण्यात आली.

यावेळी पद्मदुर्ग जागर व गड संवर्धन संस्था अध्यक्ष आशिलकुमार ठाकुर, राहुल कासार, महेंद्र मोहिते, योगेश सुर्वे, अच्युत चव्हाण, मिलिंद भगत, सुनील शेळके, रुपेश जामकर, संदीप घरत, संतोष जंजिरकर, संदेश म्हात्रे जयवंत देडगे, खारअंबोली येथील शिवप्रेमी या स्वच्छता मोहीमेत उपस्थित होते.



पद्मदुर्ग किल्ला स्वचछता करायची आहे असे आवाहन केले होते. त्या आवाहनाला शिवप्रेमीनी चांगला प्रतिसाद देऊन कोयता, झाडु,पंजा,पिकाव,फावडे इत्यादी साहित्य घेऊन पद्मदुर्गात आले . प्रथम गड व दुर्गादेवी कोटेश्वरी मातेचे पुजन करून किल्ला स्वच्छतेला सुरुवात करण्यात आली.गडावरील तोफा स्वच्छ करण्यात आल्या. गडावरील झाडे तोडुन गवत काढण्यात आले. बॉटल , प्लॉस्टीक पिशव्या आदिंसह वस्तू उचलण्यात आल्या. सुकलेले गवत एक जागी नेऊन जाळण्यात आले.

उन्मत्त झालेल्या सिद्दीला नामोहरम करण्यासाठी मुरुड समुद्रकिनारा पासून तीन किलोमीटर अंतरावर अरबी समुद्रात महाराजांनी पद्मदुर्ग किल्लाची निर्मिती केली. त्या किल्ल्याचे आज पर्यत संवर्धन व जतन केले नाही. किल्ल्याला ना निधी न संवर्धन यामुळे किल्ल्याची पडझड थांबत नाही.अजुन कीती वेळ घेणार या किल्ल्याच्या संवर्धनासाठी असा प्रश्न शिवप्रेमी विचारत असल्याची प्रतिक्रिया पद्मदुर्ग जागर व गड संवर्धन संस्थाचे अध्यक्ष आशिलकुमार ठाकुर यांनी दिली

# आशा सिंघानिया यांना राज्यस्तरीय पुरस्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अर्चना ट्रस्ट मुंबई या सामाजिक संस्थेच्या फाउंडर ट्रस्टी आशा सिंघानिया यांना सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल राज्यस्तरीय अनुभूती जनसेवा सन्मान पुरस्कार जाहीर झाला आहे.



टी.एम.जी. क्रिएशन्स आणि इनोव्हेटिव्ह मानबिंदू प्रकाशन या नामांकित संस्थेच्या संयुक्त विद्यामाने हा सन्मान सोहळा दि.२९ डिसेंबर रोजी मुंबई येथे आयोजित केला आहे. आशाजी सिंघानिया यांनी १९८३ पासून अर्चना ट्रस्टचे माध्यमातून पनवेल तालुक्यातील विविध आदिवासी वाड्या वस्त्यावर पक्की घरे,पाणी पुरवठा ,समाजमंदिर,वीज जोडणी तसेच स्वयं रोजगारसाठी विविध साहित्य देऊन त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्याचा प्रयत्न केला आहे.

तीस वर्ष गोरगरीब निराधार आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी मोफत निवासी वसतिगृह चालवीत आहेत जे आजतागायत सुरू आहे आदिवासी समाजाचा विकास व्हावा यासाठी विविध प्रशिक्षण शिबिर,आरोग्य शिबीर,जाणीव जागृती अभियान तसेच शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी अर्चना ट्रस्ट सातत्याने प्रयत्न करीत आहे याचीच दखल घेऊन त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे

# पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाची महापारेषणला दोन राष्ट्रीय पारितोषिके

**रायपूर : रामप्रहर वृत्त**

पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील पारितोषिकांचे वितरण लोकसभेचे माजी सदस्य डॉ. नंदकुमार साय व छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री विजय शर्मा यांच्या हस्ते झाले.



यामध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) जनसंपर्क विभागाला सर्वोत्कृष्ट सोशल मीडिया ॲन्ड पीआर, ब्रँडिंग व भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय जागृती अभियान हा विशेष पुरस्कार मिळाला. महापारेषणचे जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. या पारितोषिकांबद्दल महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी जनसंपर्क विभागाचे अभिनंदन केले.

छत्तीसगडमधील रायपूरच्या हॉटेल बेबीलॉन इंटरनॅशनलमध्ये आयोजिलेल्या ४७व्या भारतीय जनसंपर्क परिषदेच्या समारंभात या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी पीआरएसआय चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अजित पाठक, सचिव डॉ. पीएलके मूर्ती, डॉ.यू.एस. शर्मा, डॉ. समीर गोस्वामी, रायपूर चॅप्टरचे अध्यक्ष डॉ. शाहीद अली यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी यशाचे संपूर्ण श्रेय जनसंपर्क विभाग व त्यांच्या टीमवर्कला दिले आहे. सृजनशील व नावीन्यपूर्ण काम व मीडियात सातत्याने होणारे नवे बदल समजून जनसंपर्क विभागाने कामांमध्ये वैविध्यता आणून सकारात्मक बदल केले. विशेषतः सोशल मीडियाव्दारे जनसंपर्क विभागाने महापारेषणची भूमिका लोकांसमोर सकारात्मकपणे मांडली. भविष्यातही, महापारेषणचा जनसंपर्क विभाग सातत्यपूर्ण कामगिरी करून नाव उंचावेल, असा विश्वास व्यक्त केला.

# मलेरिया, डेंग्यू जनजागृती शिबिरांचा नऊ हजार नागरिकांनी घेतला लाभ

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

महापालिका कार्यक्षेत्रात हिवताप, डेंग्यू आजाराचा प्रसार रोखण्यासाठी, नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागामार्फत विशेष शिबीरांचे आयोजन केले जात आहे. या ठिकाणी भेटी दिलेल्या नागरिकांमध्ये हिवताप, डेंग्यूबाबत प्रभावीपणे जनजागृती होत येत आहे.



जास्तीच जास्त नागरिकांपर्यंत पोहचून जनजागृती करणे करिता दि. २० डिसेंबर रोजी २६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत विविध ठिकाणी जाहिर शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिरांच्या ठिकाणी ९ हजार १४९ नागरिकांनी भेट दिली असून, ७९६ रक्त नमुने घेण्यात आले आहेत.

हिवताप डेंगी आजाराबाबत जनजागृती करणेकरिता दिनांक ०३ ऑगस्ट ते २० डिसेंबर २०२४ या कालावधीत एकूण ३६८ शिबीरांचे आयोजन करण्यात आले असून याचा १ लाख ५८ हजार ९७५ नागरिकांनी लाभ घेतला आहे यामध्ये १४ हजार ६१० रक्त नमुने घेण्यात आले आहेत.

याशिवाय गणेशोत्सव कालावधी, नवरात्रौत्सव कालावधी व इतर धार्मिक कार्यक्रमांमध्ये देखील हिवताप, डेंगी आजाराबाबत जनजागृती करण्याकरीता शिबीरांचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरांमध्ये नॉफीलीस व एडीस डासांची उत्पत्तीस्थाने प्रत्यक्षात दाखवून, तसेच डासांच्या आळ्या प्रत्यक्ष दाखवून, घराभोवती व घरांतर्गत असणारी डासोत्पत्ती स्थाने उदा. पाणी साठवून ठेवलेले ड्रम हे ओढणी, धोतर किंवा साडीच्या कपड्याने बंदिस्त करणे, त्याचबरोबर पाणी साठविण्याची भांडी व टाक्या बंदिस्त करणे व आठवड्यातून एक दिवस ती स्वच्छ करुन कोरडी ठेवणे भंगार साहित्य टायर्स इत्यादी नष्ट करणे,छतावरील प्लास्टीक शिट, ताडपत्री यामध्ये पाणी साचू देवू नये व ताप येताच त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे याबाबत नागरिकांना प्रोत्साहित करुन आवाहन करण्यात आले.

आरोग्य विभागाच्या कार्यवाही सोबतच नवी मुंबईच्या नागरीकांनी घरातील व घराभोवतालची डासउत्पत्ती स्थाने नष्ट करणे तसेच आपले घर व परिसर स्वच्छता ठेवावे,घरातील डासोत्पत्ती स्थाने नष्ट करावी, अजुबाजुचा परिसर,टेरेसवरील भंगार नष्ट केले तर नवी मुंबईत हिवताप व डेंग्यु आजारावर आळा घालणे शक्य होईल.

# फुंडे हायस्कूल येथे रायगड विभागीय वक्तृत्व स्पर्धा

**उरण : रामप्रहर वृत्त**

कर्मवीर विद्या प्रबोधिनी रयत शिक्षण संस्था सातारा, अंतर्गत रायगड विभाग कामोठे-पनवेल आयोजित वक्तृत्व स्पर्धा तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे, उरण येथे आयोजित करण्यात आल्या होत्या.




उद्‌घाटनावेळी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य सुधीर घरत, रायगड विभागाचे सहाय्यक विभागीय अधिकारी व्ही.यु. जगताप, स्थानिक स्कूल कमिटी चेअरमन कृष्णाजी कडू, विद्यालयाचे प्राचार्य एम.जी. म्हात्रे, उपमुख्याध्यापक डी.डी. भरणूके, स्कूल कमिटी सदस्य राजेश ठाकूर, रयतसेवक वाशी बँकेचे चेअरमन प्रा. किशोर पाटील, रायगड विभागीय कार्यालयातील गुजर आणि वैभव गावंड, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख व्ही. के कुटे या सर्व मान्यवरांच्या हस्ते कर्मवीर भाऊराव पाटील आणि संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. प्राचार्य म्हात्रे सर यांनी प्रास्ताविक केले.

या वेळी सहायक विभागीय अधिकारी जगताप, सुधीर घरत, कृष्णाजी कडू यांनी विविध शाखातून आलेल्या स्पर्धक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

उद्‌घाटनानंतर लगेचच स्पर्धेला सुरुवात झाली. सर्व विद्यार्थ्यांनी त्यांच्या परीने सर्वोत्तम कामगिरी बजावत भाषणे सादर केली. परीक्षकांनी प्रत्येक गटात प्रथम, द्वितीय, तृतीय आणि उत्तेजनार्थ असे चार क्रमांक काढले.

बक्षीस वितरण सोहळ्यात रायगड विभागीय अधिकारी एम.के. कोंगेरे यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वी विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते रोख रकमेचे पारितोषिक आणि प्रमाणपत्र देऊन अभिनंदन करण्यात आले तसेच सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. परीक्षक प्रतिनिधी म्हणून गवांदे मॅडम-पळस्पे, एच.आर. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. कोंगेरे आणि जगताप यांनी आपल्या मनोगतात सर्व परीक्षकांना धन्यवाद देत सर्व स्पर्धक विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

रायगड विभागातील विविध शाखातून सुमारे २०० विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य सुधीर घरत आणि स्कूल कमिटी सदस्य परेश पाटील यांच्या सौजन्याने सर्व स्पर्धक विद्यार्थ्यांच्या भोजन व्यवस्थेसाठी आर्थिक मदत करण्यात आली होती. फुंडे हायस्कूलमधील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्राचार्य साहेबांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाची उत्तम तयारी केली होती.

## दुखवटा

### लता सावंत


**नागोठणे :** रोहा शहरातील एक्सेल कॉलनी परिसरातील रहिवासी



श्रीमती लता भीमराव सावंत (वय ९२) यांचे मंगळवारी (दि.१७) निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन विवाहित मुलगे, एक विवाहित मुलगी, सुना, जावई, नातवंडे यांच्यासह मोठा परिवार आहे. दिवंगत सेवानिवृत्त उपविभागीय अधिकारी भीमराव सावंत यांच्या त्या पत्नी व रोहातील ज्येष्ठ विधीज्ञ राजन सावंत यांच्या त्या आई होत. कै. लता सावंत यांचे दशक्रिया विधी गुरुवारी (दि.२६) तर उत्तरकार्य रविवारी (दि.२९) रोहा येथेच राहत्या घरी होणार आहे.

### रवींद्र जोशी

**माणगाव :** खांदाड येथील जोशी खानावळचे रवींद्र विठ्ठल जोशी



(वय ७५) यांचे शुक्रवारी (दि.२०) निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन बहिणी, असा परिवार आहे. कै.रविंद्र जोशी हे माणगाव तालुक्यात जग्गु जोशी म्हणून सर्वत्र ओळखले जात होते. कै. रवींद्र जोशी यांचा दशक्रिया विधी रविवारी (दि.२९)भैरवी मंदिर खांदाड माणगाव येथे तर उत्तर कार्यविधी बुधवारी (दि.१) खांदाड - माणगाव येथे होणार आहे.

## निवडक

### रिटघर येथून महिला बेपत्ता

**पनवेल :** २७ वर्षीय कविता जितेंद्र भगत (रा. रिटघर) ही महिला राहत्या घरातून कोणाला काही न सांगता पैसे आणि मोबाईल घेऊन निघून गेली. तिचा शोध घेतला, मात्र सापडून आली नाही. त्यामुळे ती हरवली असल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली. तिचा वर्ण गोरा, बांधा सडपातळ असून उंची पाच फूट, दोन इंच आहे. अंगात लाल रंगाची सहावारी साडी, लाल रंगाचा ब्लाऊज घातला आहे. तिला हिंदी, मराठी भाषा बोलता येते. या महिलेबाबत अधिक माहिती असल्यास पोलीस हवालदार संजय दोरगे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### फुटपाथवर आढळला मृतदेह

**पनवेल :** पनवेल रेल्वे स्टेशन चौकीजवळील आझाद नगर झोपडपट्टीमधील मुख्य रस्त्यालगत असलेल्या फुटपाथवर एका वृद्ध इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ६५ वर्षे, डोक्याचे केस पांढरे टक्कल पडलेले, दाढी मिशी पांढरी वाढलेली, बांधा सडपातळ, उंची अंदाजे पाच फुट चार इंच आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा सहा.पो.नि.सारिका झांझुर्णे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### देविका म्हात्रेची यशस्वी कामगिरी



**पनवेल :** रायगड जिल्हा परिषद शाळा हरिग्राम या शाळेतील इयत्ता तिसरीची विद्यार्थिनी कुमारी देविका सचदेव म्हात्रे हिने शिल्पकाम या खेळामध्ये सुकापूर केंद्रातून प्रथम क्रमांक पटकावला तसेच नेरे बीट शाळेतून प्रथम क्रमांक पटकावून पनवेल तालुक्यातून तृतीय क्रमांक मिळवला. तीने जिल्हा परिषद शाळेचे नाव उंचावले आहे. येथील शाळेतील विद्यार्थ्यांना घडविणाऱ्या शिक्षकानी घेतलेली मेहनत हीसुद्धा मोठी असल्याने या यशामागे विद्यार्थ्यांसह शिक्षकावर सुद्धा अभिनंदनाचा वर्षाव करण्यात येत आहे.

### संत गाडगेबाबा यांची पुण्यतिथी



**पनवेल :** संत गाडगेबाबा यांची पुण्यतिथीनिमित्त अनंत पांडुरंग भोईर विद्यालय व रघुनाथशेठ जितेकर ज्युनियर कॉलेज दापोली-पारगावमध्ये प्राचार्या पुष्पलता ठाकूर व पयेवेक्षिका वेळेकर मॅडम यांच्या उपस्थितीत संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर दापोली गावात स्वच्छतेचा संदेश देत ज्युनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी जुनियर कॉलेज विभाग प्रमुख कटके मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली व सोनवणे मॅडम यांच्या सहकार्याने दापोली गावातील रस्ते विद्यार्थ्यांनी स्वच्छ केले. या मोहिमेत एस.डी.पाटील, बी.एच. म्हात्रे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# शेतकऱ्यांना पेंढा विक्रीतून आर्थिक उत्पन्न

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील ग्रामीण भागात भातपीकाच्या कापणी नंतर राहिलेल्या पेंढ्याला वैरण म्हणून मोठी मागणी मिळत आहे. उरण परिसर हा भारताचे कोठार म्हणून संबोधले जाते. त्यामुळे येथे मोठ्या प्रमाणात भात पीक घेतले जाते कापणीनंतर येथील पेंढ्यालादेखील वैरण म्हणून मोठी मागणी मिळत आहे. त्याचप्रमाणे या पेंढ्याचा उपयोग हा सजावटीच्या वस्तू बनविण्यासाठी केला जातो. उरण तालुक्यातील पशुधन कमी झाल्याने हा पेंढा शेतकरी घरात न वापरता विकत आहेत त्यामुळे



पेंढ्यातूनदेखील नागरिकांना आर्थिक उत्पन्न मिळत आहे.

उरण तालुक्यातील बहुतांशी शेतकऱ्यांनी भाताची मळणी झाली की शेतात पेंढा व्यवस्थित रचून साठवून ठेवला जात आहे. दशक भरापूर्वी उरण तालुक्यात आणि घरात गाई, म्हशी, बैल असे पशुधन होते. त्यामुळे हा पेंढा हा नागरिक विक्री करता न ठेवता आपल्याच पशुधनाला खाण्यासाठी राखून ठेवत असत, मात्र उरण तालुक्यात दिवसागणित पशुधन कमी होत आहे यामुळे गाई म्हशींचे गोठेदेखील लुप्त होत चालले आहेत. त्यामुळे हा पेंढा उरण तालुक्यातील नागरिक विकत आहेत त्यातून नागरिकांना चांगल्या प्रमाणात आर्थिक प्राप्ती होत आहे.

विक्रीसाठी जनावरांना चारा म्हणून साठवून ठेवलेला पेंढा सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून ताडपत्रीने झाकून ठेवला जातो. तालुक्यातील स्थानिक पेंढा खरेदी करणारे छोटे-मोठे व्यापारी हा पेंढा खरेदी करत आहेत. पूर्वी हा पेंढा घरातल्या जनावरांसाठी वापरला जात होता त्याचप्रमाणे अतिरिक्त पेंढा झाल्यावर शेतकरी तो पेंढा जाळून टाकत असत. आता मात्र त्या पेंढ्याला मागणी मिळत असल्याने हा भाताचा पेंढा शेतकरी विकत आहेत. सुका चारा म्हणून पश्चिम महाराष्ट्र विदर्भ मराठवाडा येथे हा हा पेढा जनावरांचे खाद्य म्हणून वापरला जात आहे त्याचप्रमाणे पेंढ्यापासून अनेक सजावटीच्या वस्तू करत असल्याने या पेंढ्याला मोठी मागणी मिळत आहे.

> **उरण परिसरात मोठ्या प्रमाणात भातशेती होती. येथील पशुधन कमी झाल्यामुळे येथील नागरिक पेंढा जाळत होते. आता मात्र पेंढा खरेदी करून शेतकऱ्यांना आर्थिक उत्पन्न मिळत असल्याने शेतकरी पेंढ्याचे योग्य नियोजन करत आहेत.**
>
> **-घनश्याम ठाकूर, पेंढा व्यापारी**

## मोफत नेत्रचिकित्सा शिबिर

### आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील शंभो ग्रुपच्या वतीने आकाश चौधरी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मोमीनपाडा येथील जाखमाता वेशीआई मंदिरामध्ये सुमनशिल नेत्रालयाच्या सहकार्याने मोफत नेत्रचिकीत्सा शिबिराचे आयोजन रविवारी करण्यात आले होते. या शिबिराला पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी देऊन आकाश चौधरीला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

या वेळी पनवेल पंचायत समितीचे माजी सदस्य निलेश पाटील, उद्योजक विक्रांत डिंगोरकर, शंभो ग्रुपचे अध्यक्ष आदित्या डिंगोरकर, किरण गोवारी, निलेश गायकवाड, नितीन कसाबे, हर्ष जंगम, जितु मोरे, विशाल इंगले, दिनेश गायकवाड, कुंदन जामकर, वैभव भोपी, मिलींद पवार, सिद्धेष जय, अविनाश बोडके, कृष्णा कुटे आदी उपस्थित होते.





**पनवेल : खारघरचा राजा फाऊंडेशनच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही सन २०२५ची दिनदर्शिका प्रसिद्ध केली आहे. या दिनदर्शिकेचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रविवारी झाले. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, माजी नगरसेवक अजय बहिरा, मुकीत काझी, भाजप नेते अमरीश मोकल, अमित ओझे, केदार भगत, रूपेश नागवेकर, प्रकाश खैरे, खारघरचा राजा फाऊंडेशनचे अध्यक्ष विजय पाटील, विनोद शिंदे, तात्या घाडगे, अशोक कांबळे, विजय कुलकर्णी, भगवान गायकवाड, सुभाष पाटील, एकनाथ मनियार आदी उपस्थित होते.**



**उलवे नोड : येथील ॐ साई कला क्रीडा व सांस्कृतिक मंडळाच्या वतीने रविवारी भव्य साई भंडारा आयोजित करण्यात आला होता. यानिमित्त भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत साईंचे दर्शन घेतले. या वेळी आयोजकांच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.**

## टँकरची स्कूटीला धडक; एक जण ठार

**पनवेल :** टँकरने स्कूटीला दिलेल्या धडकेत बोरले येथील हरिश्चंद्र महादेव पाटील (वय ५६) यांचा मृत्यू झाला. या अपघाताप्रकरणी टँकर चालक रावेंद्र उदयराज सिंग (रा. नागोद, सतना, मध्य प्रदेश) याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

पनवेल तालुक्यातील बोरले-अजिवली येथील हरिश्चंद्र महादू पाटील हे २१ डिसेंबर रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास आपल्या ताब्यातील स्कूटी (एमएच ०१ एडी १९७५) वरून जुना पुणे मुंबई हायवेने जेएनपीटीकडे जाणाऱ्या लेनवर देवनारायण इलेक्ट्रॉनिक दुकानाच्या समोर, कोळखेगाव बस स्टॉप येथे आले. या वेळी पाठीमागून आलेला टँकर (एमएच ४३ बीएक्स ३२०८) याने भरधाव वेगाने आणि बेजबाबदारपणे, हईगईने वाहन चालवले आणि स्कुटीला पाठीमागून ठोकर मारली.

या अपघातात डोक्यावरून चाक गेल्याने हरिश्चंद्र महादू पाटील यांचा जागीच मृत्यू झाला. शहर पोलिसांनी आरोपी रावेंद्र सिंग यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला.





**पनवेल : राज्याचे कॅबिनेट मंत्री भरत गोगावले व आमदार महेश बालदी यांचे खारपाडा नाका येथे स्वागत करण्यात आले. या वेळी माजी जि.प. सदस्य ज्ञानेश्वर घरत, कराडे खुर्दचे माजी सरपंच विजय मुरकुटे, उद्योगपती बाळूशेठ पाटील, भाजपचे तालुका उपाध्यक्ष विद्याधर जोशी, गणेश पाटील, केळवणे पं.स. युवा मोर्चा अध्यक्ष सुशिल ठाकूर, गाव अध्यक्ष रामचंद्र मोकल, सामाजिक कार्यकर्ते रत्नाकर घरत, योगेश घरत, विलास ठाकूर, धर्मेंद्र भोईर, भगवान देशमुख यांच्यासह भाजप, शिवसेना, राष्ट्रवादीसह कार्यकर्ते आदी उपस्थित होते.**

## अनधिकृत फेरीवाले, टपऱ्या, बॅनर्सवर महापालिकेची तोडक कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात अनधिकृतपणे रस्त्यांवर, फूटपाथवर अतिक्रमण करणाऱ्या फेरीवाल्यांवर, व्यावसायिकांवर, खाद्य व्यवसायिकांवर तसेच अनधिकृत बॅनर्सवर आयुक्त मंगेश चितळे यांनी तोडक कारवाई तीव्र करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. शनिवारी (दि.२१) चारही प्रभागांमध्ये कारवाई झाली.

प्रभाग समिती क कामोठे अंतर्गत फुटपाथवरती अतिक्रमण करुन अनधिकृतपणे लावण्यात आलेल्या खाद्यपदार्थाच्या स्टॉल्सवरती अतिक्रमण विभागाने कारवाई करून संबंधित ठिकाणी वापरण्यात येणारे सिलेंडर जप्त केले. तसेच वाहतूकीस अडथळा आणून रस्त्यावर अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या दोन हातगाड्या तोडण्यात आल्या. याचबरोबर फूटपाथवर उभारण्यात आलेल्या अनधिकृत टपऱ्यावर जेसीबीच्या साहाय्याने तोडक कारवाई करून फूटपाथ साफ करण्यात आले. या वेळी सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर, अधिक्षक सदाशिव कवठे, अतिक्रमण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

उपविभाग नावडेमधील नावडे कॉलनी येथे शनिवार आठवडी बाजार बंद करण्यात आला तसेच कामोठे येथे आठवडा बाजार भरवू दिला नाही. याचबरोबर नवीन पनवेलमधील जनार्दन भगत मार्गावरील फुटपाथवरील अनधिकृत शेडवरती तोडक कारवाई करण्यात आली.

खांदा कॉलनीतील फूटपाथवरील अनधिकृतपणे लावलेले बॅनर्स, दुकानांच्या नावाचे बोर्ड काढण्यात आले. तसेच फूटपाथ, रस्त्यावर अनधिकृतपणे सुरू असलेल्या खाद्यपदार्थाच्या स्टॉल्सवरचे सामान जप्त करण्यात आले.

## 'रयत'च्या वक्तृत्व स्पर्धेत गव्हाणच्या आरोही नाळे आणि सिद्धांती सुतार प्रथम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील कर्मवीर विद्या प्रबोधिनीअंतर्गत झालेल्या विभागीय वक्तृत्व स्पर्धेत रायगड विभागातून संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेज मधील आरोही बापू नाळे आणि सिद्धांती चंद्रकांत सुतार यांनी लहान गटातून भाषानिहाय अनुक्रमे मराठी व हिंदी भाषेत प्रथम क्रमांक प्राप्त केला.





आरोही बापू नाळे आणि सिद्धांती चंद्रकांत सुतार यांनी लहान गटातील वक्तृत्व स्पर्धेत अनुक्रमे मराठी व हिंदी भाषांतून प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल सर्वत्र अभिनंदन आणि कौतुकाचा वर्षाव होत आहे. या दोन्ही विद्यार्थिनींनी विभागीय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त केल्याबद्दल विद्यालयाचे आधारस्तंभ आणि रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे, उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रविंद्र भोईर, ज्युनिअर कॉलेज प्रमुख बाबुलाल पाटोळे आदिंनी अभिनंदन केले.

स्पर्धेतील सर्व सहभागी विद्यार्थ्यांना वक्तृत्व स्पर्धा विभागाचे प्रमुख सागर रंधवे व उज्वला म्हात्रे आणि सांस्कृतिक विभागप्रमुख एच.आर.पाटील यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. संस्थेच्या फुंडे येथील तु.ह.वाजेकर विद्यालयात झालेल्या विभागीय स्पर्धेतील (दि.२०) विजेत्या स्पर्धकांना रयत शिक्षण संस्थेचे विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे व सहायक विभागीय अधिकारी विलासराव जगताप यांच्या शुभहस्ते पारितोषिके वितरित करण्यात आली.

या वेळी प्राचार्य मनोहर म्हात्रे, रयत को ऑपरेटिव्ह बँकचे संचालक किशोर पाटील, संतोष गुजर, राजेंद्र चौधरी, जयवंती ठाकूर, एच.आर.पाटील, एच.एन.पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते.

## रामकृष्ण स्कूलचा वार्षिक खेळ महोत्सव

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील केवाळे येथील रामकृष्ण अ‍ॅकॅडमी इंग्लिश मिडीयम स्कूलचा वार्षिक खेळ महोत्सव दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या उत्साहात झाला.

या अ‍ॅकॅडमीत नर्सरी ते इयत्ता १० वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी आपल्या खेळ प्राविण्याचे प्रात्यक्षिक दाखविले. त्यामध्ये प्रामुख्याने धावणे, रिले, कबड्डी, क्रिकेट, गोळा फेक, थाळी फेक, रस्सी खेच अशा विविध प्रकारच्या वैयक्तीक व सांघिक खेळाचे आयोजन करण्यात आले होते. या खेळ महोत्सवाचे उद्घाटन माजी नगरसेवक अ‍ॅड. मनोज भुजबळ आदींच्या उपस्थितीत करण्यात आले.

या वेळी विद्याधिराज चॅरिटेबल ट्रस्टचे व्यंकटरमण भट तसेच खास अमेरिकन या कार्यक्रमासाठी आलेले योगेश पै त्यांच्या पत्नी उमा पै व मुलगी प्रिया पै हेसुद्धा उपस्थित होते. त्यांनी शाळेला ८५०० रुपयांची देणगीसुद्धा दिली. या वेळी मंचावर शाळेचे मुख्याध्यापक दीपक



तावडे, मुख्याध्यापिका हर्षलता चिमणकर व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. या कार्यक्रमानिमित्ताने मुख्याध्यापक दिपक तावडे यांनी प्रमुख पाहुणे अ‍ॅड. मनोज भुजबळ यांचा विशेष सत्कार व परिचय करून दिला. या निमित्ताने विद्यार्थ्यांनी मानवी मनोऱ्याचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.

अ‍ॅड.मनोज भुजबळ यांनी सांगितले की, यशाबरोबरच अपयश पचविण्याचे कौशल्य विकसित करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या भावी जीवनात उंच भरारी वेगळ्या क्षेत्रात मारावी यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन करण्यासाठी आपण तयार असल्याचे या वेळी त्यांनी सांगितले. यानिमित्ताने प्रथम कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार सोनल मॅडम यांनी मानले.

## संपादकीय

# सरकार लागले कामाला

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्यातील महायुती सरकारच्या पहिल्या अधिवेशनाचे सूप रविवारी वाजले. नागपूर येथे झालेल्या राज्य विधीमंडळाच्या या सहा दिवसीय अधिवेशनात विविध मुद्द्यांवर सांगोपांग चर्चा झाली. अधिवेशन कालावधीत १७ विधेयके मंजूर झाली असून दोन विधेयके प्रलंबित राहिली. अधिवेशनानंतर खातेवाटपही जाहीर झाले आहे.

**राज्यात महायुतीचे सरकार मोठ्या संख्याबळाने सत्तेवर आल्यानंतरचे हे पहिलेच नियमित अधिवेशन होते. त्यामुळे या अधिवेशनाकडे सर्वांचे लक्ष होते. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला नव्या सरकारमधील मंत्र्यांचा शपथविधी झाला. ३३ कॅबिनेट आणि सहा राज्यमंत्री अशी एकूण ३९ नेत्यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. यासह मजबुतीने व एकसंधपणे सत्ताधारी अधिवेशनास सामोरे गेले. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत एकूण ७८ सदस्य नवीन निवडून आले, तर पाच जण विधान परिषदेवरून विधानसभेत आले. या सर्वांनी पहिल्याच कामकाजात आपला सहभाग नोंदवला. अधिवेशनात दोन्ही सभागृहांमध्ये मिळून १७ मंजूर विधेयके मंजूर झाली, तर संयुक्त समितीकडे एक व विधानसभेत एक अशी दोन विधेयके प्रलंबित राहिली आहेत. एकंदरपणे या अधिवेशनाचा कालावधी कमी असला तरी काम मोठ्या प्रमाणावर झाले. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी ३५,७८८ कोटींच्या पुरवण्या मागण्या सादर झाल्या. यामध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी १४०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. अधिवेशनात एकूण सहा बैठका झाल्या, तर एकूण ४६ तास २६ मिनिटे कामकाज झाले. या काळात बीड, परभणी, कल्याण येथील घटनांबरोबरच विविध विषयांवर चर्चा झाली. स्वत: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील कायदा सुव्यवस्था महत्त्वाची असल्याने घडलेल्या सर्व घटनांची चौकशी सुरू असून गुन्हेगारीची पाळेमुळे खणून काढू, असे स्पष्ट केले. त्याचप्रमाणे राज्याचा समतोल विकास साधला जाईल हे सांगण्यासही ते विसरले नाही. आता नव्या सरकारचे पहिले अर्थसंकल्पीय अधिवेशन ३ मार्चपासून सुरू होईल. यापूर्वी झालेल्या विशेष अधिवेशनात विधानसभा अध्यक्षांची निवड झाली होती. या महत्त्वाच्या पदावर ॲड. राहुल नार्वेकर यांनाच संधी देण्यात आलेली आहे, तर सरलेल्या हिवाळी अधिवेशनात विधान परिषदेलाही सभापती मिळाले. प्रा. राम शिंदे हे या पदावर विराजमान झाले आहेत. जुलै २०२२पासून हे पद रिक्त होते. अशा प्रकारे नव्या सरकारकडून सर्व गोष्टींची पूर्तता होत असताना मंत्र्यांना खातेवाटप कधी होणार याची सर्वांना प्रतीक्षा होती. अधिवेशन संपताच रात्री खातेवाटप जाहीर झाले. यामध्ये अपेक्षेप्रमाणे महत्त्वाचे गृह खाते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे असणार आहे. याशिवाय ऊर्जा, विधी आणि न्याय ही खाती त्यांच्याकडे आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नगरविकास व गृहनिर्माण, तर दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे अर्थ व राज्य उत्पादन ही खाती देण्यात आली आहेत. खातेवाटपात भाजपने शिवेंद्रराजे भोसले (सार्वजनिक बांधकाम), जयकुमार गोरे (ग्रामविकास); तर राष्ट्रवादीने माणिकराव कोकाटे (कृषी), बाबासाहेब पाटील (सहकार) व मकरंद पाटील (मदत व पुनर्वसन) या नव्या चेहऱ्यांना संधी देत महत्त्वाची खाती दिली आहेत. खातेवाटप झाल्याने महायुती सरकारच्या कामकाजास अधिक गती येणार आहे. आता पालकमंत्रिपदाचे वाटप होणे बाकी आहे. ते झाल्यावर सर्व जिल्ह्यांना मंत्री मिळतील.**

# स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांना मिळतेय व्यासपीठ




### खबरबात
विजय मांडे

दिवाळी झाली की, विद्यार्थ्यांना वार्षिक स्नेहसंमेलनाचे वेध लागतात. अगदी किलबिलमधील चिमुरड्यांसह महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सुद्धा कधी एकदा स्नेहसंमेलन येतंय असे झालेले असते. साधारणपणे डिसेंबर ते फेब्रुवारीच्या पहिल्या आठवडयापर्यंत स्नेहसंमेलनांचे आयोजन होत असते. विद्यार्थ्यांबरोबरच पालकांनाही या काळात आपल्या शाळेतील स्नेहसंमेलनाचे दिवस आठवल्या शिवाय रहात नाहीत. मात्र हे खरे की स्नेहसंमेलनांच्या आयोजनामुळे विद्यार्थ्यांना हक्काचे व्यासपीठ मिळते आणि त्यातूनच मोठे कलाकार तयार होतात. याचा अनुभव आपल्या सर्वांना आहे.

स्नेहसंमेलन म्हटले की शाळांमध्ये विद्यार्थी प्रतिनिधींची निवड व महाविद्यालयात त्याला जीएस हे गोंडस नाव दिलेले असते. यासाठी निवडणुका होत असत. मध्यंतरी या निवडणुका बंद झाल्या. पूर्वी हुशार आणि चुणचुणीत विद्यार्थ्याची वर्ग प्रमुख म्हणून निवड होत असे आणि त्यामधून वार्षिक स्नेहसंमेलनासाठी एक विद्यार्थी प्रतिनिधी आणि एक विद्यर्थीनी प्रतिनिधीची निवड होत असे. गेल्या वर्षी एखादया स्थानिक संस्थेच्या निवडणुकीसारखी निवडणूक होणार होती आणि त्यातून जीएसची निवड होणार होती परंतु मुंबई विद्यापीठाकडून अद्यापही मार्गदर्शक सूचना न आल्याने या निवडणुका टळल्या अन्यथा त्या झाल्या असत्या तर किती भांडणे शिवाय किती आर्थिक उलाढाल निस्तरता निस्तरता प्राचार्य आणि प्राध्यापकांच्या नाकी नऊ आले असते.

दोन वर्षे कोरोनाच्या संकटामुळे स्नेहसंमेलनांचे आयोजन नाईलाजाने बंद होते. कोरोना संपल्यानंतर पुन्हा स्नेहसंमेलनांचे आयोजन सुरू झाले आणि संस्था चालकांसह पालक, विद्यार्थी, शिक्षक त्यामध्ये गुंतू लागले. स्नेहसम्मेलनाच्या दहा – बारा दिवस अगोदर सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे सराव सुरू होतात. तर काही दिवस अगोदर मैदानी व अन्य खेळांच्या स्पर्धा सुरू असतात. त्यानंतर कोण पाहुणे असावेत. याची चर्चा असते. त्यासाठी विविध समित्या स्थापन करून त्यांच्यावर जबाबदारी दिलेली असते. खरे तर विद्यार्थ्यांबरोबर पालकांनासुद्धा व्यासपीठावरील पाहुण्यांचे मार्गदर्शन किंवा विचार ऐकायचे नसतात. पण एक सोपस्कार म्हणून ते गप गुमान त्यांचे भाषण ऐकत असतात. इकडे सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी वेशभूषा करून तयार असलेल्या विद्यार्थ्यांना कधी एकदा उदघटनाचा समारंभ पार पडतो. असे झालेले असते. एखादा पाहुणा उशिरा आला किंवा एखाद्याने आपले भाषण लांबवले तर पालकांच्या चेहऱ्यावरील भाव टिपण्यासारखे असतात. कधी कधी प्रमुख पाहुण्यां बरोबर त्यांचे मित्र किंवा सहकारी आलेले असतात. त्यांना व्यासपीठावर बसवता बसवता आयोजकांची म्हणजेच त्या समितीत असलेल्या शिक्षकांची मोठी पंचाईत होते. त्यातच व्यासपीठावर असलेले प्रत्येक जण बोलणार की काय? या कल्पनेनेच उपस्थित पालकांच्या पोटात गोळा आलेला असतो. याचा अनुभव आपल्या प्रत्येकाला कधी न कधी आलेला असतो.

सांस्कृतिक कार्यक्रम हे स्नेहसम्मेलनातील एक मुख्य मर्म असते. कारण किलबिल ते अगदी पाचवी–सहावीच्या विद्यार्थ्यांनासुद्धा वेशभूषा करताना पालकांबरोबरच शिक्षकांची पुरेवाट होते. सामुदायिक नृत्य असेल तर विचारूच नका. पालकांना त्यासाठी लागणारे ड्रेस शोधून आणता आणता कधी दिवस जातो ते कळतच नाही. सांस्कृतिक कार्यक्रम चालू असताना पूर्वी फोटोग्राफरफोटो काढत असे आता प्रत्येकाकडे मोबाईल असल्याने आपापल्या पालकांचे व्यासपीठावरील फोटो काढण्याची जणू स्पर्धाच लागलेली असते. त्यांना आवरता आवरता शाळेच्या शिक्षकांची व आयोजकांची कसरत असते.

शाळेतील वार्षिक स्नेहसंमेलनांमध्ये सहभाग घेतल्याने मी इथ पर्यंत येऊन पोहोचलो असे अनेक यशस्वी कलाकार नेहमीच सांगत असतात. ते शंभर टक्के खरे आहे. कारण शाळा – महाविद्यालयांनी आयोजित केलेल्या स्नेहसंमेलनामध्ये विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाते. त्यामुळेच विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव मिळतो. काही महाविद्यालयात खेळां बरोबरच कलेचा सुद्धा विशेष गुणवत्ता म्हणून विचार करून महाविद्यालयांमध्ये प्रवेश दिला जातो. कर्जतचे म्हणायचे झाले तर सुप्रसिद्ध अभिनेत्री जुई गडकरी हिने शाळेपासूनच गायन किंवा अभिनयाचे धडे घेतले आहेत. त्यानंतर तिने महाविद्यालययातील स्नेहसम्मेलनामध्येही नेहमीच सहभाग घेऊन आपली कला विकसित केली. त्याचप्रमाणे प्रदीप गोगटे याने सुद्धा याच प्रकारे आपली कला विकसित केली आणि आता तो अभिनेता, दिगदर्शक म्हणून समोर येऊन त्याने निर्मित केलेल्या 'वळण' या शॉर्ट फिल्मला विविध प्रकारची तब्बल ५८ पारितोषिके मिळाली आहेत.

महाविद्यालयातील वार्षिक स्नेहसंमेलनांसाठी अगदी भाऊ कदम, कुशल बद्रिके यांच्यापासून ते प्रसिध्द अभिनेत्रीं, ज्येष्ठ कवी अशोक नायगावकर, प्रवीण दवणे, अरुण म्हात्रे यांची सुध्दा उपस्थिती होत असते. त्यामुळे शाळा महाविद्यालयां मधील स्नेहसम्मेलनांचे आयोजन विद्यार्थ्यांसाठी खूप मार्गदर्शक ठरते. हे झाले शाळा महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचे पण काही वर्षांपासून एखाद्या शाळेत शिकलेले माजी विद्यार्थी सुध्दा स्नेहसंमेलन साजरे करतात. काहीजण दहा वर्षे झाली म्हणून तर काही जण पंचवीस, पन्नास अगदी साठ पासष्ट वर्षे शाळा सोडून झाली तरी त्या स्नेहसंमेलनात उपस्थित असतात आणि मग शाळेतील आठवणींचा उजाळा करताना अनेकांचे डोळे पाणावतात. हे सारे आपल्या शाळे बद्दलची ओढ असलेलेच

करू शकतात. या स्नेहसंमेलनांमध्ये इतक्या वर्षांच्या चांगल्या वाईट अनुभवाची चर्चाही अगदी आपुलकीने होत असते. काही हौशी वर्गमित्र प्रत्येक वर्षी अशा प्रकारची स्नेहसंमेलनांचे आयोजन करतात आणि आपल्या शाळेसाठी आर्थिक मदतीचा हात पुढे करतात. एकंदरीत अबाल वृद्धांना स्नेहसंमेलनांच्या आयोजनाची ओढ असते हे खरे..

## बदलते तंत्रज्ञान

# एकच व्हॉट्सॲप नंबर दोन फोनमध्ये असा वापरा

जगातील सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या मेसेजिंग प्लिकेशन्सपैकी एक म्हणजे व्हॉट्सप. वैयक्तिक चॅट्स असो किंवा कामानिमित्त एखादा संवाद साधण्यासाठी या ॲपवर सगळेच अवलंबून असतात, पण ज्यांच्याकडे एकापेक्षा जास्त उपकरणे आहेत त्यांच्यासाठी एकाच वेळी अनेक उपकरणांवर व्हॉट्सप क्सेस करणे खरोखरच गेम चेंजर ठरू शकते. यासाठी तुम्हाला लिंक डिव्हायसेस फीचर मदत करू शकते, जे विविध डिव्हाइसवर एकच अकाउंट वापरण्याचा सोपा मार्ग ऑफर करते, मग तो दुसरा फोन, टॅब्लेट किंवा लॅपटॉप असो.




व्हॉट्सॲपच्या लिंक डिव्हायसेस फीचरमुळे युजर्सना त्यांचा प्रायमरी फोन ऑफलाइन असला तरीही चार अतिरिक्त डिव्हायसेसवर (उपकरणांवर) त्यांचे खाते क्सेस करण्यास परवानगी देते. प्रत्येक युजर्स क्यूआर कोड स्कॅन करून, दुसरा फोन, टॅबलेट आणि लॅपटॉप लिंक करून करू शकतात. पण, कॉलिंग फीचर्स प्राथमिक डिव्हायसेससाठीच उपलब्ध असतील.

**दोन फोनमध्ये एकच व्हॉट्सप नंबर कसा वापरायचा?**

दुसरा ॲण्ड्रॉईड फोन किंवा iPhoneवर WhatsApp वापरायचे असल्यास या स्टेप्स फॉलो करा

१. तुमच्या प्रायमरी फोनमधील व्हॉट्सॲप उघडा.

२. स्क्रीनच्या वरच्या उजव्या कोपऱ्यात, सेटिंग्ज उघडण्यासाठी तीन ठिपक्यांवर (मेनू चिन्ह) टॅप करा. मेनूमधून लिंक्ड डिव्हायसेस पर्याय निवडा.

३. Linked Devices सेक्शनमध्ये आल्यावर Linked Devicesवर टॅप करा. त्यानंतर क्यूआर कोड क्टिव्हेट होईल.

४. नंतर तुमच्या दुसऱ्या फोनवर जा. जर तिथे व्हॉट्सप इन्स्टॉल नसेल, तर आधी ॲप इन्स्टॉल करा आणि उघडा.

५. तुमच्या दुसऱ्या फोनवर तुम्ही वेगळा नंबर वापरत असल्यास, तुम्हाला त्या नंबरसह लॉग इन करण्याची सूचना येईल. हे टाळण्यासाठी दुसऱ्या फोनमधील स्क्रीनच्या वर उजव्या कोपऱ्यात असलेल्या तीन ठिपक्यांवर टॅप करा आणि Link as a Companion Device हा पर्याय निवडा.

६. दुसऱ्या फोनवर एक क्यूआर कोड दिसेल. हा कोड स्कॅन करण्यासाठी तुमच्या पहिल्या फोनवर क्यूअर स्कॅनर वापरा. एकदा स्कॅन यशस्वी झाल्यानंतर, तुमचे व्हॉट्सप चॅट लोड होण्यास सुरुवात होईल आणि तुम्ही दोन्ही फोनवर तुमची संभाषणे पाहू शकाल.

# ...म्हणून साजरा करतात शेतकरी दिन



### निमित्त

माजी पंतप्रधान आणि शेतकरी नेते चौधरी चरण सिंह यांच्या जन्मदिवशी म्हणजेच २३ डिसेंबर रोजी भारतात 'शेतकरी दिन' साजरा केला जातो.

भारताचे माजी पंतप्रधान आणि शेतकरी नेते चौधरी चरणसिंह यांचा जन्मदिन 'शेतकरी दिन' म्हणून साजरा केला जातो. चौधरी चरण सिंह यांनी शेतकऱ्यांचे आयुष्य आणि परिस्थिती सुधारण्यासाठी अनेक धोरणांची सुरुवात केली होती. त्यांच्या या योगदानासाठी भारत सरकारने २००१ पासून चौधरी चरण सिंह यांच्या सन्मानार्थ दरवर्षी २३ डिसेंबर हा दिवस 'शेतकरी दिवस' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. या दिवशी किसान घाटावर त्यांना सलामी दिली जाते. शासनाकडून वेगवेगळी प्रदर्शने आणि शेतीसंबंधित कार्यशाळा आयोजित करतात.

भारताचे पाचवे पंतप्रधान चौधरी चरणसिंह यांनी २८ जुलै १९७९ ते १४ जानेवारी १९८०पर्यंत अत्यंत अल्प कालावधीसाठी पंतप्रधान म्हणून देशाची सेवा केली. अत्यंत साध्या मनाचे ते अत्यंत साधे जीवन जगणारे होते.

आपल्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात त्यांनी भारतीय शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी अनेक धोरणे सुरू केली. चौधरी चरणसिंह यांचे आकर्षक व्यक्तिमत्त्व आणि शेतकर्यांच्या हिताच्या विविध धोरणांनी भारतातील सर्व शेतकर्यांना जमीनदार आणि धनदांडग्यांच्या विरोधात एकत्र केले. भारताचे दुसरे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांनी दिलेल्या 'जय जवान जय किसान' या प्रसिद्ध घोषणेचे त्यांनी पालन केले. चौधरी चरणसिंह हे एक अतिशय यशस्वी लेखक होते आणि त्यांनी अनेक पुस्तकेही लिहिली ज्यात शेतकरी आणि त्यांच्या समस्यांबद्दल त्यांचे विचार मांडले गेले. शेतकर्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांनी विविध उपायांच्या स्वरूपात खूप प्रयत्न केले.

चौधरी चरणसिंह हे शेतकरी कुटुंबातील होते आणि त्यामुळे भारताचे माननीय पंतप्रधान असूनही त्यांनी अतिशय साधे जीवन जगले. भारत हा मुख्यत: खेड्यांचा देश आहे आणि खेड्यांमध्ये राहणारी बहुसंख्य लोकसंख्या शेतकरी आहे आणि शेती हा त्यांच्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत आहे. अजूनही ७०% भारतीय लोकसंख्या शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नावर अवलंबून आहे. १९६० च्या दशकात पंजाब आणि हरियाणामध्ये विकसित झालेल्या हरित क्रांतीने देशाचे कृषी चित्र बदलले. यामुळे उत्पादकता वाढली आणि त्यामुळे भारत विविध कृषी मालामध्ये स्वयंपूर्ण झाला.

शेतकरी हा भारताचा कणा आहे. आपल्या देशातील शेतकऱ्यांनी केलेल्या महान कार्याचा गौरव करण्यासाठी केंद्र सरकारतर्फे २३ डिसेंबर रोजी राष्ट्रीय शेतकरी दिन साजरा करतो.

चौधरी चरण सिंह यांनी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्रीपद भूषवले होते. यादरम्यान त्यांनी अनेक महत्त्वाची कामे केली. त्यांच्यामुळेच आज शेतकरी खऱ्या अर्थाने स्वतंत्र झाला. त्यांनी जमीनदारी रद्द केली. शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांनी लेखापद पद बनवले.

आंतरराष्ट्रीय स्थलांतरित दिवस हा जगातील स्थलांतरितांच्या समस्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्याचा दिवस आहे. आज जगभरात आंतरराष्ट्रीय स्थलांतराविषयीलोकांमध्ये जागरूकता आणि सकारात्मक विचार करण्याची गरज आहे. जागतिक शांततेसाठी, कामाच्या शोधात किंवा इतर कारणांमुळे इतर देशांमध्ये स्थायिक झालेल्या लोकांच्या समस्या गांभीर्याने समजून घेणे आणि सोडवणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणूनच आंतरराष्ट्रीय स्थलांतरित दिवस दरवर्षी १८ डिसेंबर रोजी साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश लोकांना शिक्षित करणे हा आहे. **(साभार : इंटरनेट)**

### क्लिक...क्लिक...!



**श्रीवर्धन : दिवेआगर समुद्र किनाऱ्यावरील अप्रतिम सुर्यास्त पर्यटकांना खुणावत आहे. (छाया : अमेय नाझरे)**

## आरोग्य प्रहर

# रात्री जेवणानंतर गोड पदार्थ खाण्याची सवय धोकादायक

रात्रीच्या जेवणानंतर अनेकांना गोड खायला आवडते. बरेच लोक रात्रीच्या जेवणानंतर आइस्क्रीम खायला बाहेर पडतात. तर काही जण खास जेवणानंतर खाण्यासाठी घरी रसगुल्ला, गुलाबजाम, चॉकलेट असे पदार्थ आणून ठेवतात. पण, ही सवय आपल्या आरोग्यासाठी चांगली नसते. त्यामुळे तुम्हालाही अशा प्रकारे गोड खाण्याची सवय असेल, तर ती आजच थांबवा, कारण त्यामुळे तुमच्या शरीरावर नेमके काय परिणाम होतात हे आपण जाणून घेऊ



या विषयावर सार्वजनिक आरोग्य तज्ज्ञ डॉ. जगदीश हिरेमठ म्हणाले की, जेव्हा तुम्ही गोड पदार्थ खाता, तेव्हा तुमच्या रक्तातील साखरेची पातळी वाढते, कारण ग्लुकोज रक्तप्रवाहात जाते, ज्यामुळे ही वाढ नियंत्रित करण्यासाठी इन्सुलिनचा स्राव होण्यास सुरुवात होते. रात्रीच्या वेळी चयापचय क्रिया मंदावते. त्यामुळे शरीराची साखरेची पातळी हाताळण्याची क्षमता मोठ्या प्रमाणात कमी होते. रक्तात साखरेची पातळी वाढताच शरीराच्या हायपोग्लायसेमियात घट होते. त्यामुळे झोपेचा त्रास होऊ शकतो आणि सकाळी थकवा जाणवू शकतो.

रात्रीच्या जेवणानंतर साखरेचे किंवा गोड पदार्थांचे सेवन केल्याने शरीराच्या सेल्युलर आणि हार्मोनल पातळीवर परिणाम होतो. त्यामुळे शरीराला इतर गोष्टी सोडून ग्लुकोज चयापचयावर लक्ष केंद्रित करावे लागते. एका अभ्यासातून असे दिसून आले की, रात्री उशिरा गोड पदार्थांचे सेवन केल्याने इन्सुलिन सेन्सिटिव्हिटी कमी होते. त्यामुळे चयापचय विकारांचा धोका वाढतो. रात्री उशिरा जास्त साखरयुक्त पदार्थ खाल्ल्याने त्याचे चरबीत रूपांतर होते, ज्यामुळे वजन वाढते.

रात्रीच्या वेळी गोड पदार्थ खाल्ल्याने झोपेच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. त्यामुळे शरीरास पुरेशी विश्रांती मिळत नाही. कारण– त्यामुळे हार्मोनल आणि चयापचय क्रिया बाधित होते. साखरेच्या सेवनाने झोपेचे नियमन करणारे हार्मोन मेलाटोनिनवर दबाव निर्माण होतो. त्याच वेळी कॉर्टिसोल हार्मोनमध्ये वाढ होते. हा हार्मोन तणावास कारणीभूत ठरतो. त्याचा तुमच्या झोप, विश्रांतीवर वाईट परिणाम होतो.

याव्यतिरिक्त डॉ. हिरेमठ यांनी म्हटले की, रक्तातील साखरेची पातळीत अचानक झालेली वाढ आणि घट यांमळे तुमच्या झोपेवर दुष्परिणाम होतो. अचानकपणे साखरेच्या पातळीत वाढ झाल्याने शरीरास ऊर्जा मिळते, पण यामुळे अस्वस्थताही जाणवू शकते. अशा वेळी साखरेची पातळी कमी करणे कठीण होते. कालांतराने रात्रीच्या वेळी नियमित साखरेचे सेवन केल्याने निद्रानाश आणि स्लीप ॲप्नियासह विशेषत: वजन वाढणे आणि चयापचय क्रिया विस्कळित झाल्याने झोपेसंबंधित आजारांचा धोका वाढू शकतो.

# मोहोपाडा परिसरात महाविकास आघाडीला धक्का

## खासदार सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत कार्यकर्ते राष्ट्रवादीमध्ये



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील वासांबे मोहोपाडा ग्रामपंचायत हद्दीतील काही सदस्यांनी रविवारी (दि. २२) रोजी राष्ट्रवादी अजित पवार गटात असंख्य कार्यकर्त्यांसह जाहीर पक्षप्रवेश करुन महाविकास आघाडीला जोरदार हादरा दिला आहे.

यावेळी (उबाठा गटाचे) केदार अनंता भोईर, राष्ट्रवादी (शरद पवार गटाचे) कविता संतोष मांडे, कॉंग्रेसचे जेष्ठ पदाधिकारी प्रमोद राईलकर, कॉंग्रेस आयचे रविंद्र जांभळे, उबाठाचे बाबू वाघमारे, शेकापचे सुधीर मांडे, उबाठाचे विल्लम मार्टिस्ट, रवींद्र पाटील, संदेश मांडे, जगदीश मांडे, कैलास तांडेल यांच्यासह शेकाप, राष्ट्रवादी (शरद पवार गट ) आणि उबाठा मधिल शेकडो जणांनी जाहीर पक्षप्रवेश केला. रायगडचे खासदार सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत हा भव्य पक्ष प्रवेश सोहळा झाला.

राष्ट्रवादीचे नेते माजी सरपंच संदीप मुंढे यांच्या नेतृत्वाखाली हा पक्षप्रवेश पार पडला. दोन ग्रामपंचायत सदस्यांसह, महाविकास आघाडीतील घटक पक्षाच्या प्रमुख पदाधिकारी यांनी अनेक कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश केला आहे.

या वेळी सरपंच उमाताई संदीप मुंढे, ग्रामपंचायत सदस्य संदीप मुंढे, सदस्या स्वप्नाली मैंदर्गीकर, संगीता भोईर, महिला आघाडी प्रमुख वर्षाताई पाटील, वासांबे अध्यक्ष मुकूंद जांभळे, विभागप्रमुख वर्षा चौधरी, हरीश उतेकर, सुदाम मुंढे, संतोष पाटील, ग्रामसंघाच्या. कांबळे, जयराम पाटील, मांडे सर कार्यकर्ते उपस्थित होते.

## अनधिकृत भंगार गोदामावर दादर सागरी पोलिसांचा छापा

### अपहार केलेला १० लाखांचा माल जप्त

**पेण : प्रतिनिधी**

मुंबई- गोवा महामार्गावरील पेण तालुक्यातील जिते गावाजवळ असणाऱ्या आकाशदीप हॉटेलच्या पाठीमागे परप्रांतीयांनी अनधिकृतपणे भंगारचा अड्डा उभारला असून या ठिकाणी कंपन्यांचा येणार माल चोरीद्वारे घेतला जात असल्याची माहिती दादर सागरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संजय कुमा ब्राह्मणे यांना मिळताच त्यांनी त्या ठिकाणी धाड टाकून जेएसडब्ल्यू कंपनीचा १० लाखांचा स्टील बार जप्त केला असून आरोपीस अटक केली आहे.

रायगड जिल्ह्याच्या अनेक भागांमध्ये गेल्या काही दिवसांपासून अनाधिकृतपणे भंगारवाल्यांचे जाळे मोठ्या प्रमाणावर पसरले आहे. जेएसडब्ल्यू कंपनी डोलवी येथून टीएमटी स्टील बार माल विविध कंपन्यांना सप्लाय करण्यासाठी ज्योती स्ट्रान्सपोर्ट मधील ट्रेलर एमएच ४६ बीएम ६५८९ वरील चालक व इतर काही ट्रेलर वाहनचालकांनी हा पूर्ण माल विविध कंपन्यांना न पुरविता अंदाजे १५ ते २० टन मालाचा अपहार करून तो जिते येथील आकाशदीप हॉटेलच्या पाठीमागे मोकळ्या जागी अनधिकृतपणे उभारलेल्या भंगारवाल्यांकडे उतरविले असल्याची माहिती फिर्यादी कंपनीचे जनरल मॅनेजर पंकज कुमार अग्रवाल यांनी दादर सागरी पोलीस स्टेशनला दिली. त्यानुसार पोलीस निरीक्षक संजयकुमार ब्राह्मणे धाड टाकून माल जप्त केला.

## माणगाव तहसीलदारांची प्रगतशील शेतकऱ्याच्या शिवाराला भेट

### ◆ मुंबई, पुण्यातील बाजारपेठेत पिवळ्या, लाल कलिंगडाला मागणी

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील नाणोरे गावचे प्रगतशील शेतकरी संदीप दसवते यांची माणगावचे तहसीलदार दशरथ काळे यांनी गुरुवारी (दि.१९) शेताच्या बांधावर जाऊन भेट घेतली व त्या शेतकऱ्यांची प्रशंसा केली.

संदीप दसवते यांनी ५ एकर वरकस जागेत लाल व पिवळ्या रंगाची कलिंगड शेती केली असून शेतकरी कशा पद्धतीने कलिंगड लागवड करतो व पिक घेतो याबाबत माणगाव तहसीलदार यांनी माहिती घेतली. तहसीलदार हे शेतकरी कुटुंबातील असल्यामुळे त्यांना शेतीची मोठी आवड असल्याचे या वेळी दिसुन आले.





प्रगतशील शेतकरी संदिप दसवते यांनी बोलताना सांगितले की, कलिंगड लागवडीसाठी खूप मेहनत घ्यावी लागते तसेच वन्य प्राण्यांपासून शेतीचे फार मोठे नुकसान होऊ नये म्हणून चारही बाजूला कुंपण केली जाते. कलिंगड वाशी व पुणे या ठिकाणी विक्रीसाठी जातात कंपनीसोबत करार झाला असल्याने कंपनीचे कर्मचारी शेतीत येऊन कलिंगड घेऊन जातात. कंपनीचे कर्मचारीसुद्धा चांगल्याप्रकारे सहकार्य करीत असतात.

डिसेंबर २०२४ मध्ये ५० टन कलिंगड काढून विक्रीला मुंबई, पुणे बाजारपेठत पाठवला असून परत दुसऱ्या ठिकाणी १० एकर जागेत कलिंगड लागवड केली आहे व हे पिक दोन महिन्यात मिळणार असून या कलिंगड शेतीतून सात ते आठ लाखापर्यंत नफा मिळण्याची शक्यता व्यक्त केली.

माणगांव तहसीलदार यांचे शेतकऱ्यांनी शेतावर कलिंगड शेती पाहण्यासाठी आल्यामुळे त्यांचे सहपत्नी शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तहसीलदार यांनीसुद्धा शेतकऱ्याला अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## गृहराज्यमंत्री योगेश कदम यांचे माणगावात स्वागत

**माणगाव : प्रतिनिधी**


नवनिर्वाचित गृहराज्यमंत्री योगेश कदम यांचे माणगाव नगरीत रविवारी (दि.२२) माणगावमधील सामाजिक कार्यकर्ते संजय गांधी व सहकारी यांनी फटाक्यांच्या आतषबाजीत जोरदार स्वागत केले.

या वेळी सामाजिक कार्यकर्ते संजय गांधी, राष्ट्रीय ओबीसी कर्मचारी महासंघाचे राज्य अध्यक्ष अनिल नाचपल्ले, काशिनाथ गाणेकर, संजय शिंदे, सौरभ पांडे व सहकारी यांनी ना. योगेश कदम यांना पुष्पहार घालून त्यांचे अभिनंदन केले.



# डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे स्वच्छता अभियान





**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग स्वच्छता व सामाजिक उपक्रम राबवून लोकांना विविध सेवा मिळवून देण्याचे सामाजिक कार्य डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा तर्फे केले जाते. आरोग्य, स्वच्छता बरोबरच स्मशानभूमि स्वच्छता मोहिम हाती घेण्यात आली असून, त्यासोबत मुस्लिम समाजातील कब्रस्थानांची स्वच्छता करुन मानवता धर्माचे जतन करण्यात आले आहे.

समाजातातील प्रत्येक व्यक्तीला स्वच्छतेचे महत्व कळावे व त्यांच्यात जनजागृती व्हावी या उद्देशाने भारत देशाचे स्वच्छता दूत, पयत्री, महाष्ट्रभूषण डॉ. श्री. आप्पासाहेब धर्माधिकारी व आदरणीय डॉ. श्री. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली अलिबाग तालुक्यांतील रेवदंडा ते अलिबाग मुख्य रस्त्याचे दुतर्फा स्वच्छता अभियान राबविण्यात आले. आज झालेल्या स्वच्छता अभियानामध्ये १२२४ श्रीसदरयांनी एकूण ६८.२० किमी रस्ता स्वच्छ केला असून, त्यातून ४३.९८० टन कचरा गोळा करण्यांत आला व त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली.

## वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांना दंड

**अलिबाग** : वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शनिवारी (दि.२१) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ५४१ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी या वाहनचालकांकडून चार लाख ७७ हजार ३०० रुपये इतका दंड आकारला आहे. या धडक कारवाईमुळे वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.


### अलिबाग नगरपरिषद

**जाहीर निविदा सूचना**

अलिबाग नगरपरिषदेकारिता खालील प्रमाणे इच्छुक उमेदवारांद्वारे ऑफलाईन पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचा तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १ | अलिबाग नगरपरिषद करिता स्वच्छ महाराष्ट्र मिशन (ना.) २.० व माझी वसुंधरा अभियान अंतर्गत IEC activity राबविणे. | **दि.** २३.१२.२०२४ **ते** ३१.१२.२०२४ पर्यंत राहील. **वेळ :** सायंकाळी ४.०० पर्यंत **ठिकाण :** अलिबाग नगरपरिषद |

अधिक माहिती व निविदा फॉर्म अलिबाग नगरपरिषदेच्या आरोग्य विभागात उपलब्ध आहेत.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**अलिबाग नगरपरिषद**



### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, खालील वर्णनाची शेत मिळकत ही माझे अशिलांनी कायम खरेदीखताव्दारे विकत घेण्याचे ठरविले आहे. सदरचे मिळकतीबाबत माझे अशिल लवकरच खरेदीखत करण्याच्या बेतात आहे. सदरच्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे आहे.

**शेत मिळकतीचे वर्णन**
**मौजेः गावठाण, ता. उरण, जि. रायगड**

| गाव | सर्व्हे क्र./ भूमापन क. | हिस्सा क्र. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू/पैसे |
|---|---|---|---|---|
| गावठाण, ता. उरण. | ३० | ३ | ०-२९-३० पो.ख. ०-०२-१० एकुण ०-३१-४० | ४.५६ |

तरी वरील मिळकतीचे वर्णनांत नमुद शेतमिळकतींबाबत कोणत्याही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठेकरार, विकसन करारनामा, कुळहक्क वहीवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध दिवाणी दावा, महसूली वाद, असल्यांस त्याच्या लेखी हकरती त्यांचे हरकतीतील नमुद केलेल्या हक्कांबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ११ दिवसांत माझे खालील पत्त्यावर पाठवून दयावी, उपरोक्त दिवसांत जर कोणाकडून कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार खालील पत्त्यावर न मिळाल्यास माझे अशिल सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजून खरेदी व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर मागाहून कुणाचीही कसलीही हरकत अगर तक्रार चालणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**ठिकण** : **धुतूम, उरण**
**ता. २२/१२/२०२४**

**सही/-**
**ॲड. किशोर धनाजी ठाकुर**
**कार्यालय** :- ऑफीस क्र. २, जय भवानी संकुल, जय भवानी पेट्रॉल पंप जवळ, जे. एन. पी.टी - कलंबोळी रोड, पौंडखार गाव, पो. जासई (व्हाया पनवेल-४१०२०६) ता. उरण, जि. रायगड.


## बोरघाटात वाहनांची वर्दळ वाढल्याने वाहतुकीवर परिणाम

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती व जुन्या महामार्गावर वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे . बोरघाटात वाहनांची वर्दळ अचानक वाढल्याने वाहतूकीवर याचा परिणाम होत वाहतूक संथगतीने व काही ठिकाणी ठप्प झाली होती. बोरघाट वाहतूक पोलिसांनी वाहतूक कोंडी होणार नाही याची दक्षता घेतली असली तरी वाहनांची संख्या अचानक वाढल्याने वाहतूक संथ गतीने सुरू होती.



दोन दिवसांवर येऊन ठेपलेला नाताळ सण तसेच पुढील आठवड्यात सलग सुट्ट्या असल्याने मुंबई ठाणे नवी मुंबई मधील पर्यटक मुंबई बाहेर पडत कोकण व पश्चिम महाराष्ट्रातील देवदर्शनासाठी तसेच लोणावळा खंडाळा एन्जॉय करायला निघाले आहेत. यामुळे मुंबई पुणे द्रुतगती व जुन्या महामार्गावर वाहनांची संख्या मोठ्या संख्येने वाढली आहे. बोरघाटात वाहनांची वर्दळ अचानक वाढल्याने वाहतूकीवर याचा परिणाम होत वाहतूक संथगतीने व काही ठिकाणी ठप्प झाली होती. बोरघाट वाहतूक पोलिसांनी वाहतूक कोंडी होणार नाही याची दक्षता घेतली असली तरी वाहनांची संख्या अचानक वाढल्याने वाहतूक संथ गतीने सुरू होती. संध्याकाळी ५ वा पर्यंत बोरघाटात वाहतूक धिम्या गतीने सुरू होती.

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग आणि मुंबई-पुणे जुना महामार्ग वाहनांची संख्या वाढल्याने या मार्गावर बोरघाटात ट्राफिक जामचा सामना वाहन चालकांना करावा लागला. रविवार आणि दोन दिवसांवर येऊन ठेपलेला ख्रिसमस याची सांगड घालून मुंबई नवी मुंबई ठाण्यातील पर्यटक कोकण व पश्चिम महाराष्ट्रातील देवदर्शनासाठी तसेच लोणावळा खंडाला पर्यटन करण्यासाठी निघाल्याने खालापूर टोल नाक्याच्या पुढे बोर घाटात वाहनांची संख्या अचानक वाढल्याने हा महामार्ग ही काळ संथगतीने सुरू होता तर अर्धा तास वाहतूक ठप्प होती.

## मुस्लिम समाजाकडून ब्लँकेटचे वाटप

**मुरूड : प्रतिनिधी**

सध्या मुरूड तालुक्यात खूपच थंडी पडत असून लोक सायंकाळी स्वेटर घातलेले दिसून येतात. मुरूड नगर परिषदेचे कर्मचारी रोज सकाळी पहाटे उठून मुरूड शहराची साफसफाई नित्य नियमाने करीत असतात. थंडीपासून सफाई कर्मचारी यांचे संरक्षण व्हावे यासाठी मुरूड शहरातील जमातुल मुस्लमिन मोहल्ला बाजारपेठेकडून मुरूड नगर परिषदेचे ६० स्वच्छता कर्मचारी वृंदाना मोफत ब्लँकेट वाटप करण्यात आले.

जमातुल मुस्लिमीन मोहल्ला बाजारचे अध्यक्ष राशीद उमर फाईम, उपाध्यक्ष मुसद्दीक कादरी सचिव लियाकत रोगे सहसचिव जाहिद फकजी खजिनदार मोइन दामाद तसेच सदस्य समीय दामाद आदी मान्यवरांच्या हस्ते हे वाटप करण्यात आले. समाजाभिमुख कार्यक्रम राबवल्याबद्दल सफाई कर्मचारी यांनी आनंद व्यक्त केला आहे.




सिडको
शहरांचे शिल्पकार

### जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून,खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा / वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | नोड व संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र./ हि.क्र. | संपादित क्षेत्र (हे.आर.) | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **ता. पनवेल, जि. रायगड** | | | | | | | | |
| १ | उलवे ४६३ | गव्हाण ७९२ | २/६ | ०-०९-४ | १०० चौ.मी. | उलवे नोड येथील भूखंड क्र.C-२६, सेक्टर-८, क्षेत्र-९९.५६ चौ.मी. | **मुळ भूधारक कै. घनश्याम हरीश्चंद्र कोळी (मयत) यांचे वारस** १. श्रीमती पुष्पावती घनश्याम कोळी २.श्री. किशोर घनश्याम कोळी ३. श्रीमती प्रतिभा घनश्याम कोळी ४. श्रीमती रत्नप्रभा घनश्याम कोळी ५. श्री.विलास घनश्याम कोळी | - |
| २ | उलवे ५७८ | गव्हाण ३६९ | ११/३ १२/२ | ०-५६-७ ०-०८-१ | ६०० चौ.मी. | उलवे नोड येथील भूखंड क्र.२१०, सेक्टर-१९, क्षेत्र-५९९.९८ चौ.मी. | **मुळ भूधारक कै. घनश्याम हरीश्चंद्र कोळी (मयत) यांचे वारस** श्रीमती पुशावती उर्फ पुष्पावती घनश्याम कोळी | - |
| | | गव्हाण २३३ | ८६/१० | ०-०५-८ | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**सहा. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**(पनवेल)**
**सिडको/जनसंपर्क/३६९/२०२४-२५**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

# डीपीएस फ्लेमिंगो तलावाचे होणार संवर्धन

**नवी मुंबई : बातमीदार**

वर्षाच्या सुरुवातीला गुलाबी पक्ष्यांचा मृत्यू झालेला ३० एकरचा नवी मुंबईतील नेरूळ येथे डीपीएस फ्लेमिंगो तलाव संवर्धन राखीव (कॉनेर्वशन रिसर्वे) म्हणून राखला जाईल, असे माहितीच्या अधिकाराखाली (आरटीआय) मिळालेल्या माहितीवरून दिसून येते.

राज्य सरकारने नियुक्त केलेल्या उच्चाधिकार समितीने हा निर्णय घेतला होता. ज्याने पर्यावरणवाद्यांच्या ओरडानंतर फ्लेमिंगो निवासस्थानाचे संरक्षण करण्याच्या मार्गात गेले. त्यानुसार राज्य खारफुटी सेल सरोवराला संवर्धन राखीव म्हणून मानण्यासाठी सरकारला शिफारस करेल, अशी माहिती काल नॅटकनेक्ट फाऊंडेशनकडून प्राप्त झाली आहे.



तलावात तब्बल १७ फ्लेमिंगो मरण पावले आहेत. जानेवारीमध्ये सात फ्लेमिंगो सध्या बंद पडलेल्या नेरूळ जेट्टीसाठी बांधलेल्या एका महाकाय साइन बोर्डला धडकले होते. १० मे रोजी पाण्याचा प्रवाह रोखल्यामुळे तलाव कोरडा पडल्यानंतर ही घटना घडली होती, असे नॅटकनेक्ट संचालक बी. एन. कुमार यांनी सांगितले.

तत्कालीन वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेच्या सभागृहात दिलेल्या आश्वासनानंतर नैसर्गिक फ्लेमिंगो गंतव्यस्थानाच्या संरक्षणासाठी उपाय सुचवण्यासाठी जुलैमध्ये समिती नेमण्यात आली होती. समितीने तलावाचे सर्वेक्षण करून २३ सप्टेंबर रोजी आपल्या शिफारशी अंतिम केल्या, मात्र त्या अद्याप सार्वजनिक करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे नॅटकनेक्ट फाऊंडेशनने समितीच्या शिफारशींचा तपशील मागवला आहे.

समितीचा महत्त्वाचा निर्णय असा होता की, मॅन्ग्रोव्ह सेलने डीपीएस फ्लेमिंगो तलावाला संवर्धन राखीव म्हणून घोषित करण्याची शिफारस करताना, तलावातील फ्लेमिंगोवरील बीएनएचएस अभ्यासाचा समावेश करून तो डेहराडून येथील वन्यजीव संस्थेकडे पाठवला जाईल, असे सांगितले आहे. समितीचा भाग असलेल्या सिडकोने समितीच्या बैठकीत असा युक्तिवाद केला आहे की, डीपीएस फ्लेमिंगो तलाव विकसित करण्याचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे, आरटीआय माहिती सांगते.

मुंबई उच्च न्यायालयाने नोव्हेंबर २०१८मध्ये सिडकोला पाणथळ जागा संरक्षित करण्याचे आदेश दिले होते आणि तलावातील सर्व मलबा हटवण्याचे निर्देश नगर नियोजकांना दिले होते. तथापि, राज्य समितीने सिडकोला तलावाला हानी पोहचवू नये आणि तलावातील आंतरभरतीचे पाणी न अडवण्याचे कळवले आहे. दरम्यान, राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या (एनजीटी) प्रधान खंडपीठाने फ्लेमिंगोच्या मृत्यूची स्वतःहून दखल घेतली आहे. पश्चिम विभागीय खंडपीठाला विविध प्राधिकरणांकडून स्पष्टीकरण मागितले आहे.

नॅटकनेक्टने एनजीटीकडे हस्तक्षेप अर्ज दाखल करून सिडकोला पाणथळ जागा जतन करण्याचे निर्देश द्यावेत आणि नवी मुंबई महानगरपालिका बीएचएनसच्या सहकार्याने तिचे संवर्धन करण्याची परवानगी द्यावी. सिडकोने आपल्या विकास आराखड्यात तलाव क्षेत्र भविष्यातील विकासासाठी निश्चित केले आहे, ज्याला नॅटकनेक्टने तीव्र विरोध केला आहे.

### एनजीटीची सुनावणी पुढील महिन्यात

डीपीएस सरोवराचे संरक्षण करण्याच्या समितीच्या निर्णयाचे स्वागत करताना, कुमार म्हणाले की, नवी मुंबईची फ्लेमिंगो सिटी म्हणून ओळख आणि जैवविविधता टिकवून ठेवण्यासाठी उपयोग होणार आहे. हेदेखील पर्यावरणवाद्यांनी केलेल्या सामूहिक प्रयत्नांचे परिणाम आहे आणि आम्ही प्रामाणिकपणे आशा करतो की सरोवराचे संवर्धन करण्यासाठी शिफारसींचे पालन केले जाईल, असे नवी मुंबई एन्व्हायर्नमेंटल प्रिझर्वेशन सोसायटीचे संदीप सरीन म्हणाले.

## निवडक

### तुर्भेत बारमध्ये महिलेला मारहाण

**नवी मुंबई :** मैत्रिणीसोबत झालेल्या भांडणातून बारमध्ये महिलेला मारहाण झाल्याची घटना तुर्भेत घडली आहे. ही घटना गुरुवारी रात्री घडली. चेतन सिंग, अक्रम खान व त्यांच्या एका साथीदारावर एपीएमसी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. त्यांचा मैत्रिणीसोबत वाद झाला होता. या वादातून त्यांच्या परिचयाच्या महिलेसोबत त्यांचा बारमध्ये वाद झाला असता महिलेला तिघांनी मारहाण केली. या प्रकरणाचा पोलीस तपास करत आहेत.

### ‘विद्याभवन’च्या वेदिका खोतचे यश

**नवी मुंबई :** पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्या



भवन शिक्षण संकुलाच्या इयत्ता नववीतील वेदिका सुभाष खोत या विद्यार्थिनीने आर्ट ऑफ लर्निंग फाउंडेशन द्वारा आयोजित नवराष्ट्र २० वी नॅशनल योगासन चॅम्पियनशिप स्पर्धेत एनएमएमसी शाळा क्रं.१०३ शिरवणे येथे १५ डिसेंबर रोजी ३०० स्पर्धकांची स्पर्धा झाल्या. या स्पर्धेत पुणे विद्यार्थी गृह आर्टिस्टिक योगासन प्रकारात द्वितीय क्रमांक पटकावला. वेदिका खोत हिने ट्रॅडिशनल योगा स्पर्धेत तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. मान्यवरांच्या हस्ते सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन वेदिकास सन्मानित करण्यात आले.

### बालवैज्ञानिक स्पर्धेत ‘विद्याभवन’चे यश

**नवी मुंबई :** पुणे विद्यार्थी गृहाच्या विद्याभवन शिक्षण संकुलातील आठ विद्यार्थ्यांनी डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेच्या पहिला टप्प्यात उत्तीर्ण झाले. आर्यन सचिन बोराडे, श्रेया विकास नरवडे, नंदिनी अजित शिंदे, ओंकार दिलीप शिंदे, श्रेया धांद्रूत, मिहीर मिरजे, तन्मय लकूम, आर्या नात्ती यांनी या स्पर्धेची पहिली फेरी उत्तीर्ण केली आहे. पुणे विद्यार्थी गृहाचे कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे, कुलसचिव दिनेश मिसाळ, मुख्याध्यापक गोरख कदम, सुवर्णा मिसाळ, श्रीजा नायर, मनीषा मुळीक, समन्वयक पांडुरंग मुळीक यांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



### पालेभाज्या झाल्या स्वस्त

**पनवेल :** थंडीचा हंगाम सुरू असल्याने फळभाज्या, पालेभाज्या बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात विक्रीस येत आहेत. भाज्यांच्या पिकांसाठी हे वातावरण पोषक असल्याने उत्पादन वाढते. त्या अनुषंगाने त्यांचे दरही घटले आहेत. पालेभाज्या स्वस्त झाल्या आहेत.

# पाण्याचे नवीन पर्यायी स्रोत निर्माण करावे -आमदार मंदा म्हात्रे

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई शहराची भविष्यात वाढणारी लोकसंख्या पाहता पाणी प्रश्न अति जिव्हाळ्याचा होणार आहे. पाण्याची वाढती गरज लक्षात घेऊन नवी मुंबई महापालिकेने अतिरिक्त पाण्याचे स्रोत निर्माण करावे. त्याकरिता नवी मुंबईकरांसाठी पाण्याचे नवीन पर्यायी स्रोता निर्माण करावे त्यासाठी शासनाने तातडीची कार्यवाही व उपाययोजना करावी, अशी मागणी बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात केली आहे.



नवी मुंबई महापालिकेच्या स्वतःच्या मालकीचे मोरबे धरण आहे. या धरणातून शहराला मुबलक पाणीपुरवठा केला जात आहे. शहरातील वाढत्या लोकसंख्येचे प्रमाण तसेच विविध शासकीय आणि खाजगी गृहनिर्माण प्रकल्पामुळे निर्माण होणारी अतिरिक्त पाण्याची मागणी भविष्यात निर्माण होणार आहे. त्यामुळे धरणांमधून होणारा पाणीसाठा नवी मुंबईतील नागरिकांना कमी पडेल म्हणून आमदार मंदा म्हात्रे यांनी नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनामध्ये शहरातील नागरिकांसाठी पाण्याचे नवीन पर्यायी स्रोताबाबत औचित्याच्या मुद्द्याद्वारे मागणी केली आहे.

याशिवाय रायगड जिल्ह्यातील टाटा पॉवरच्या भिरा हायड्रो इलेक्ट्रिक प्रकल्पाचे पाणी मोरबे धरणापर्यंत पाईपलाईनद्वारे आणण्याचा निर्णय घेणे, अतिरिक्त पाणी मोरबे धरणामध्ये साठवण्यासाठी धरणाची उंची वाढवने आदी मार्गाचा विचार करावा, अशी मागणी अधिवेशनात आमदार मंदा म्हात्रे यांनी केली आहे.

# आजपासून क्षयरुग्ण शोधमोहीम

## नवी मुंबईतील अतिजोखमीच्या कार्यक्षेत्रात उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

कमीत कमी कालावधीत समाजातील निदान न झालेले क्षयरुग्ण शोधून त्यांना उपचाराखाली आणणे व क्षयरोगाबाबत समाजात जनजागृती करणे या उद्देशाने केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार २३ डिसेंबर २०२४ ते ०३ जानेवारी २०२५ या कालावधीत सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहीम नमुंमपाच्या अतिजोखमिच्या कार्यक्षेत्रात राबविण्यात येणार आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत ही मोहीम शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अतिजोखमिच्या कार्यक्षेत्रात राबविण्यात येणार असून महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे याच्या मार्गदर्शनाखाली ८० पथकांच्या माध्यमातून एकूण ३१८०३ घरांमध्ये अंदाजित एकूण १,५९,०१४ लोकसंख्येला भेटी देऊन नागरीकांची तपासणी करण्यात येणार असून तसेच क्षयरोगाबाबत जनजागृतीदेखील करण्यात येणार आहे. प्रत्येक पथकाने दररोज ४० ते ५० घरांना भेट देऊन माहिती संकलीत होईल, अशा प्रकारे पथके तयार केली आहेत.

दोन आठवड्यांपेक्षा जास्त खोकला, दोन आठवडयांपेक्षा जास्त ताप, वजनात लक्षणीय घट, थुंकीवाटे रक्त येणे, छातीत दुखणे, मानेवरील गाठ या लक्षणांबाबत विचारणा करण्यात येणार आहे. यामध्ये क्षयरोगाची लक्षणे आढळल्यास संबंधितांची थुंकी नमुने आणि एक्सरेद्वारे तपासणी करून अंतिम निदान निश्चित करण्यात येणार आहे.

या मोहिमेमुळे क्षयरोगाच्या निदानाअभावी अद्यापही वंचित असणाऱ्या जास्तीत जास्त क्षयरुग्णांचा प्रशिक्षित पथकाद्वारे शोध घेऊन त्यांना क्षयरोग औषधोपचारावर आणणे हे उद्दीष्ठ साध्य करण्यात येणार आहे. या मोहिमेमध्ये नागरिकांनी उत्तम प्रतिसाद देऊन क्षयरोगाची लक्षणे आढळल्यास थुंकी नमुने देऊन उद्दीष्ट साध्य करण्यात सहकार्य करावे, असे आवाहन नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

# विद्यार्थ्यांनी घेतले स्केटिंगचे धडे

## चॅम्पियन अनोली शाहकडून मार्गदर्शन

**नवी मुंबई : बातमीदार**

ऑर्किड्स द इंटरनॅशनल स्कूलने त्यांच्या सिवूड्स कॅम्पसमध्ये राष्ट्रीय स्केटिंग चॅम्पियन अनोली शाह यांच्यासोबत एक विशेष मास्टरक्लासचे आयोजन केले होते. १६६ सुवर्णपदके, १२३ रौप्यपदकं आणि ८८ कांस्यपदकं जिंकलेल्या अनोली शाह यांनी खेल महोत्सव २०२४ या वार्षिक क्रीडा सोहळ्याच्या अंतर्गत विद्यार्थ्यांशी चर्चा करत आपला प्रेरणादायक प्रवास आणि यशाचे कौशल्य शेअर केले. हा कार्यक्रम फिट इंडिया उपक्रमाच्या माध्यमातून क्रीडा क्षेत्रातील प्राविण्य साजरा करण्यासाठी आयोजित केला जात आहे.

अनोली शाह यांनी एशियन रोलर स्पोर्ट्स चॅम्पियनशिप आणि वर्ल्ड स्पीड स्केटिंग चॅम्पियनशिप यांसारख्या प्रतिष्ठित स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले आहे, त्यांनी विद्यार्थ्यांना स्केटिंगमध्ये मिळवलेल्या



यशाचे रहस्य आणि त्यामागील शिस्त याविषयी मार्गदर्शन केले. अनोली शाह यांच्या मास्टरक्लासनंतर विद्यार्थ्यांना फुटबॉल, तायक्वांदो, पोहणे आणि बास्केटबॉल यांसारख्या विविध क्रीडा प्रकारांच्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभागी होता येणार आहे.


प्रत्येक खेळासाठी प्रख्यात क्रीडापटूंमार्फत मास्टरक्लासेस आयोजित केल्या जाणार आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांना समृद्ध अनुभव मिळेल. विद्यार्थ्यांसोबत झालेल्या संवादात अनोली शाह म्हणाल्या, भारतामध्ये स्केटिंग हळूहळू लोकप्रिय होत आहे आणि ऑर्किड्स द इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांमध्ये असलेली उत्सुकता आणि समर्पण पाहून मला खूप आनंद झाला.

# शेअर मार्केटच्या मोहात गमावले ३६ लाख रुपये

**नवी मुंबई :** व्हॉट्सअ‍ॅपवर आलेल्या लिंकला क्लिक करणे एका व्यक्तीच्या अंगलट आले. शेअर मार्केटमध्ये नफा कमावू पाहणाऱ्याने ३६ लाख रुपये गमावले. पैसे भरल्यानंतर कोणताही मोबदला न मिळाल्याने फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्याने पोलिसांत तक्रार केली. याप्रकरणी वाशी पोलिसांनी अज्ञातावर गुन्हा दाखल केला आहे.

वाशी परिसरात राहणाऱ्या ६८ वर्षीय व्यक्तीसोबत हा प्रकार घडला आहे. त्यांना व्हॉट्सअ‍ॅपवर शेअर मार्केटबद्दल माहिती देणारी लिंक आली होती. त्यावर विश्वास ठेवून त्यांनी लिंकवर क्लिक केले असता, त्याला व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपमध्ये घेण्यात आले. त्याठिकाणी प्रशिक्षण व त्यातून होणाऱ्या नफ्याची त्यांना माहिती दिली. त्यावर विश्वास ठेवून त्याने टप्प्याटप्प्याने ३६ लाख २८ हजार रुपये गुंतविले. काही दिवसांनी अधिक पैशाची मागणी होऊ लागल्याने व गुंतविलेली रक्कम परत मिळत नसल्याने फसवणूक झाल्याचे त्याच्या लक्षात आले. पोलीस तपास करीत आहेत. ऑनलाईन व्यवहार करताना सावध राहण्याचे आवाहन नवी मुंबई पोलीस दलाच्या सायबर सेलने नागरिकांना केले आहे.

# वासुदेवबुवा सुतार यांना आदरांजली



**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

नवी मुंबईतील सुप्रसिद्ध भजनकार, भजनरत्न वासुदेवबुवा सुतार यांचा प्रथम पुण्यस्मरण सोहळा रविवारी शिरवणे येथे झाला. या वेळी सांप्रदायिक संगीत भजन मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते.

या संगीत भजन मैफिलीत संगीत अलंकार शशिकांतबुवा पारगावकर, विष्णुबुवा ओवळेकर, अशोकबुवा म्हात्रे, मनोहरबुवा भंडारी, देवेंद्र पवार, लक्ष्मणबुवा कोळी, विष्णूबुवा भोपी, चंद्रकांत पाटील, श्याम सुतार, किशोर भंडारी, विनायक भोईर आदी गायक, वादक कलावंतांनी रंग भरला.

भजनरत्न वासुदेवबुवा सुतार हे नवी मुंबईतील एक आघाडीचे भजन कलावंत होते. सांप्रदायिक संगीत भजना बरोबरच त्यांचे येथील नाट्य चळवळीतही महत्वाचे योगदान होते. वासुदेवबुवा सुतार हे केवळ शिरवणे गावाचेच नाही तर संपूर्ण नवी मुंबईचे भूषण होते, असे प्रतिपादन माजी महापौर जयवंत सुतार यांनी या वेळी केले.

सूत्रसंचालन सामाजिक कार्यकर्ते रामभाऊ पाटील व आदर्श शिक्षक अनंत म्हात्रे गुरुजी यांनी केले तर भजनरत्न नंदकुमार सुतार यांनी उपस्थितांचे यथोचित आभार मानले.

# गव्हाण विद्यालयात शिक्षक व माता पालक संघाची सभा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये शालेय विद्यार्थ्यांच्या शिस्त, शैक्षणिक गुणवत्तेचा आढावा आणि विद्यालयाच्या भौतिक सुविधा व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा आणि सर्व अनुषंगिक बाबींचा विचार विमर्श करण्यासाठी शासनाच्या निर्देशानुसार शिक्षक पालक संघ आणि माता पालक संघाची सभा विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे यांच्या अध्यक्षतेखाली व शिक्षक पालक संघाचे अध्यक्ष कुंदन मोकल आणि उपाध्यक्ष नामदेवराव ठाकूर यांच्या उपस्थितीत झाली.



या वेळी विद्यालयाच्या रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे, ज्येष्ठ शिक्षिका चित्रलेखा पाटील आणि शिक्षक पालक संघाचे सचिव देवेंद्र म्हात्रे व माता पालक संघाच्या सचिव सारिका ठाकूर आणि पालक प्रतिनिधी उपस्थित होते.

या वेळी अध्यक्षीय भाषणात विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे यांनी विद्यार्थ्यांच्या विद्यार्थ्यांच्या शालेय शिस्त आणि त्या संदर्भात विद्यालय घेत असलेली खबरदारी याविषयी माहिती सांगून पालकांच्या महत्त्वपूर्ण सूचनांचा आदर करण्याचे अभिवचन दिले. रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर यांनी या वेळी पालकांना संबोधित करताना पालकांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये विशेष महत्त्वाची भूमिका बजावण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले.

ज्येष्ठ शिक्षिका चित्रलेखा पाटील यांनीही विद्यार्थी, शिक्षक व पालक ह्या शैक्षणिक त्रिकोणाच्या तीन बाजू असल्याचे सांगून विद्यार्थ्यांच्या विविध समस्या व त्या संदर्भात ह्या तिन्ही घटकांची विशेष भूमिका याविषयी सखोल मार्गदर्शन केले. शिक्षक-पालक संघ व मातापालक संघाच्या सभांचे प्रास्ताविक शिक्षक पालक संघाचे सचिव देवेंद्र म्हात्रे यांनी केले तर सागर रंधवे यांनी आभार मानले.

# शाळांमध्ये विज्ञान प्रदर्शन

**नवी मुंबई : बातमीदार**

नमुंमपा शाळांतील विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रूजविण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्साही सहभाग घेत हा उपक्रम यशस्वी केला.

नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाच्या वतीने दिवा ऐरोली येथील नमुंमपा शाळा क्र. ४८, ९१, १२० याठिकाणी नमुंमपा शालेय स्तरावरील विज्ञान प्रदर्शन झाले. ज्यामध्ये विद्यार्थी, शिक्षकांनी उत्साही सहभाग घेत हा उपक्रम यशस्वी केला. शिक्षण विभागाच्या उपायुक्त संघरत्ना खिल्लारे यांच्या हस्ते, शिक्षणाधिकारी अरुणा यादव यांच्या प्रमुख उपस्थितीत या प्रदर्शनाचे दिमाखदार उद्घाटन करण्यात आले. नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाचे सर्व प्र.विस्तार अधिकारी व केंद्र समन्वयक याठिकाणी उपस्थित होते.

या नमुंमपा स्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे संपूर्ण नियोजन प्र. विस्तार अधिकारी तथा केंद्र समन्वयक ऐरोली सुप्रिया पायरे यांनी ऐरोली गटातील शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्यातून उत्तम रितीने केले.



# उरण महाविद्यालयात युटोपिया महोत्सव

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील या जीवन अध्ययन व निरंतर शिक्षण विभागाच्या वतीने युटोपिया या महोत्सवाचे आयोजन केले गेले. उद्घाटनीय कार्यक्रमात रमेश ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.



महाविद्यालयाचे प्राचार्य के. ए.शामा यांनी या महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या सुप्त गुणांना चालना द्यावी, असे सांगितले. प्रा.व्हि.एस. इंदुलकर यांनी महोत्सवाचा इतिहास सांगितला. महाविद्यालयात मागील पाच वर्षांपासून युटोपिया महोत्सव आयोजित केला जातो. यावर्षीच्या महोत्सवाची थीम बर्फ प्रदेश ही होती. अतरंगी, रिल्स, फोटोग्राफी, आर्टिस्ट विदाऊट ब्रश, मास्टर शेफ,शार्क टेन्क,आर्ट अटॅक, अंदाज-ए-बयान इत्यादी विविध स्पर्धांचे आयोजन केले गेले. अतिशय वेगळ्या व तरुणाईत अत्यंत आकर्षण निर्माण करणाऱ्या स्पर्धा महोत्सवात आयोजित केल्या गेल्या.

समारोप कार्यक्रमात क्षेत्र समन्वयक डॉ.बी. एस. पाटील (सिकेटी महाविद्यालय, पनवेल) यांनी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व अशाच पद्धतीने उत्साही राहून जीवन जगले पाहिजे असे सांगितले. प्राचार्य के.ए.शामा यांनी या वेळी आपल्या भावना व्यक्त केल्या. रमेश ठाकूर कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. उपस्थितांचे आभार अजीवन अध्ययन विभाग प्रमुख प्रा. व्हि.एस. इंदुलकर यांनी व्यक्त केले.

समारोपीय कार्यक्रमात विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. आय.क्यू. ए.सी समन्वयक डॉ. ए.आर.चव्हाण सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी या वेळी उपस्थित होते. महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी अकाउंटंट अँड फायनान्स विभागातील प्रा. रियाज पठाण, प्रा. हन्नज शेख, प्रा. विनिता तांडेल, प्रा. निलोफर मुकरी, प्रा. पूजा गुप्ता आदी व डीएलएलई विभागातील सर्व विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली.

## निवडक

### म्हसळ्यात विनयभंग; आरोपी जेरबंद

**म्हसळा :** येथील खेडेगावात २० ते ३० वर्षे वयाचे महिलेचा ३० वर्षीय आरोपीने बलात्कार केल्याची घटना घडली. ही घटना जून २०२४ ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत घडल्याची तक्रार फिर्यादीने दिल्याने म्हसळा पोलिसांनी गुन्ह्याची नोंद करून आरोपीला तत्काळ अटक केले. आरोपीने ही घटना अन्य कोणासही सांगितले तर तुझी बदनामी करीन, असेही धमकावल्याचे फिर्यादीने पोलिसांना सांगितले. आरोपी मूळचा विदर्भातील असून म्हसळा पोलिसांनी त्याला जेरबंद केले आहे. अशी माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप कहाळे यांनी दिली.

### नाभिक समाज बांधवांची बैठक



**नागोठणे :** नाभिक समाजाचे थोर हुतात्मा वीरभाई कोतवाल पुण्यतिथीच्या नियोजनासाठी नाभिक समाज बांधवांची बैठक झाली. या वेळी समाजाच्या विविध विषयांवर देखील चर्चा विनिमय करण्यात आली. दरम्यान बाळासाहेब टके यांना उपस्थितांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. हुतात्मा वीरभाई कोतवाल पुण्यतिथीच्या नियोजनासाठी नाभिक समाज बांधवांची घेण्यात आलेल्या बाळासाहेब टके, शामकांत नेरपगार, महेंद्र माने, सुधाकर निंबाळकर, दिगंबर खराडे, मिलिंद गुजर,मनोज गायकवाड, जगदीश दिवेकर, महेंद्र पवार,राहुल मोहिते, संदेश मोहीते, दिपक पवार, रविंद्र पवार, संदिप कडू सुशील टके, विलास भोसले,महेंद्र जाधव, रुपेश साळुंखे, दिपक पवार, महेंद्र यादव, राजेंद्र माने आदी समाज बांधव उपस्थित होते.

### चंद्रशेखर भडसावळे यांना पुरस्कार



**धाटाव :** एसआरटीचे संशोधक, सगुणा बाग कृषी पर्यटनाचे जनक कृषिरत्न चंद्रशेखर भडसावळे यांना शेती तंत्र संशोधनाबद्दल ट्रस्ट फ़ॉर ॲडव्हान्समेंट ईन एग्रीकल्चर सायन्स दिल्ली संस्थेकडून अत्यंत प्रतिष्ठेचा भारतातील पहिलाच नॉर्मन इनोव्हेटिव्ह फार्मर पुरस्कार प्रदान करण्यात आला. एग्रीकल्चर सायन्स संस्थेने गौरविल्याने कृषीरत्न चंद्रशेखर भडसावळे यांच्या कृषीसंबधी संशोधन, कार्यावर शिक्कामोर्तब झाले. एसआरटी तंत्रज्ञानाला देशात अधिक पसंती मिळेल, कृषी क्षेत्र, शेतकऱ्यांचा सर्वांग स्तर अधिक उंचावेल हेच अधोरेखीत झाले आहे. दरम्यान, याआधी महाराष्ट्र शासनाने कृषिभूषण कृषीरत्न पुरस्काराने चंद्रशेखर भडसावळे यांना गौरविण्यात आले आहे, तर अडसावळे यांचे तंत्रज्ञान फायदेशीर ठरले आहे, त्याच कार्याचा हा गौरव मानला जात आहे.

### नूतन वर्ष दिनदर्शिकेचे प्रकाशन

**पाली :** सुधागड तालुका रहिवाशांच्या शैक्षणिक व सामाजिक विकासासाठी कार्यरत असलेल्या ठाणे शहरातील सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ ठाणे या संस्थेच्या २०२५ दिनदर्शिकेचे प्रकाशन संस्थेच्या कार्यालयात अध्यक्ष विठ्ठल घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या वेळी विजय पवार, विजय जाधव, प्रकाश शिलकर, शंकर काळभोर, जनार्दन घोंगे, चिमाजी कोकाटे, विठ्ठल खेरटकर, रमेश सागळे, गणपत डिगे, अनिल सागळे, सुरेश शिंदे, राकेश थोरवे, दत्ता सागळे, अनिल चव्हाण, राम भोईर, श्याम बगडे, सखाराम चव्हाण, सखाराम घुले, भगवान तेलंगे, राजेश बामणे, प्रवीण बामणे, अजय जाधव आदी उपस्थित होते.

### संत गाडगेबाबा यांची पुण्यतिथी



**मुरूड :** संत गाडगे बाबा महाराज यांची पुण्यतिथी नांदगाव हायस्कूल येथे करण्यात आली. या वेळी या शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना खोत यांच्या हस्ते गाडगे महाराज यांच्या तासबिरीला पुष्प माला अर्पण करण्यात आली. कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक अर्चना खोत, पर्यवेक्षक प्रतिक पेडणेकर, शिक्षक प्रतिनिधी योगेश पाटील, महेश वाडकर, राहील घलटे, महादू अहिरे, निशा बिरवाडकर, जयश्री घाडगे, नियती ठमके, रवींद्र भोई, दत्ता खुळपे, सागर राऊत, भारत चव्हाण, मंगेश नांदगावकर, संतोष बुल्लू आदी उपस्थित होते.




**पाली : आरटीएस रायगड टॅलेंट सर्च परीक्षा रायगड जिल्ह्यामध्ये घेतली जात आहे. मेढेखार येथे केंद्रावर परीक्षेसाठी पेझारी शाळेतील मुले सहभागी झाली होती.**

# मुरुडसाठी फायर ब्रिगेड यंत्रणा प्रभावी करणार

## ■ आमदार महेंद्र दळवी यांचे आश्वासन | आग लागलेल्या ठिकाणी पाहणी

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहराच्या विकासासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी दिला, परंतु अग्नी क्षमक दल प्रभावी करणे राहून गेले आहे. आगामी काळात मुरूड शहरासाठी अग्निक्षमक दल प्रभावी करण्यासाठी एक नवीन गाडी त्याचप्रमाणे आग विझवण्यासाठी असणारी अत्याधुनिक यंत्र सामुग्री मिळवून देण्यासाठी मी प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचे अलिबाग मुरूड विधानसभा क्षेत्राचे आमदार महेंद्र दळवी यांनी केले आहे.



मुरूड शहरातील मुख्य बाजारपेठेत गोबरे बंधू यांच्या मालकीच्या घरामधील खालच्या भागात राहणारे भाडोत्री विजय जैन यांच्या येथून आग लागली व त्या आगीने संपूर्ण इमारत भस्मसात झाली होती. या आगीमुळे गोबरे बंधू यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले होते. त्याचप्रमाणे कपड्याचे दुकान असणारे व नाकोडा ज्वेलर्सचेसुद्धा नुकसान झाले आहे. या आगीमुळे मध्यमवर्गीय उमेश गोबरे यांचे संपूर्ण जीवन उद्धवसत झाले असून त्यांचा निवारा गायब झाला आहे. त्यांचा संपूर्ण संसार आगीत भासमसात झाल्याने ते पूर्णपणे नेस्तनाभूत झाले आहेत.

संबंधित घटनेची पाहणी करण्यासाठी आमदार महेंद्र दळवी आले होते. त्यांनी जळालेली संपूर्ण इमारतीची पाहणी केली व आगीमुळे नुकसान झालेल्या लोकांना प्रत्यक्ष भेटून मोठा दिलासा दिला. त्यांचे सांत्वन करून राज्य शासनाकडून सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले तसेच उपस्थित नायब तहसीलदार सुवर्णा साळवी व तलाठी व पोलीस दलास तातडीने पंचनामा करून त्यांना शासनाची मदत तातडीने कशी मिळेल याकडे लक्ष केंद्रित करण्याचे आदेश दिले.

या वेळी आमदार दळवी यांनी उमेश गोबरे व जैन कुटुंब यांची भेट घेऊन सदरील घडलेल्या घटनेबाबत तीव्र दुःख व्यक्त केले. राज्य शासन त्याचबरोबर त्यांच्याकडून सुधा वैयक्तिक आर्थिक मदतसुद्धा करण्यात आली आहे. या वेळी आमदार दळवी यांनी पाहणी केल्यावर सांगितले की, हा संपूर्ण लाकडाचा जुना वाडा असून आगीमुळे भसम झाला आहे. नागपूर अधिवेशनात असताना मला या घटनेची माहिती मिळाली होती. अत्यंत दुर्दैवी घटना असून राज्य शासनाच्या माध्यमातून जास्तीत जास्त मदत करण्याचा मी प्रयत्न करणार आहे. मुरूड शहराची स्थापना नवाब कालीन असल्याने येथील छोट्या छोट्या भागाचे रुंदीकरण करणेसुद्धा खूप आवश्यक आहे. गोबरे कुटुंबाला मुख्यमंत्री निधीमधून मदत मिळावी यासाठीसुद्धा प्रयत्न केले जाणार आहेत. मी या सर्वांच्या दुःखात सहभागी असून मदतीसाठी मी स्वतः प्रयत्न करणार असल्याचे या वेळी त्यांनी सांगितले.

या वेळी शिवसेनेचे रायगड जिल्हा उप प्रमुख भरत बेलोसे, भंडारी बोर्डिंगचे अध्यक्ष बाबू सुर्वे, मुरूड शहर अध्यक्ष संदीप पाटील, शिवसेनेच्या रायगड जिल्हा संघटिका तृप्ती पाटील,माजी नगरसेविका युगा ठाकूर, महेश पाटील, महेश भगत, मनोज कमाने, वीरेन भगत, अरविंद गायकर, दिनेश मिनमीने व सर्व पदाधिकारी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश

***या वेळी आमदार महेंद्र दळवी यांनी महसूल विभाग व पोलीस विभाग यांना आदेश दिले की, आगीमुळे नुकसान झालेल्या लोकांना चांगले सहकार्य करून त्यांची विचारपूस करून त्यांना विश्वासात घेऊन पंचनामे केले जावेत.***

## जैन साध्वींसोबत चालणारा सेवेकरी अपघातात ठार

**खालापूर, चौक : प्रतिनिधी**

मुंबई पुणे जुन्या महामार्गावरून पनवेल कडे जाणाऱ्या जैन साधू यांच्या यात्रेत चालणाऱ्या वारीमध्ये रिक्षा घुसून झालेल्या अपघातात खोपोली शिळफाटा येथील तरुणाचा मृत्यू झाला असल्याची घटना चौक गावाजवळील रामानंद सागर फार्म हाऊस जवळ घडली. मित जैन असे दुर्दैवी तरुणाचे नाव आहे. जैन साध्वी यांना कोणत्याही प्रकारची इजा झाली नाही.



मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरून पनवेल कडे जाणाऱ्या जैन साध्वी यांच्या बरोबर सेवेकरी चालत असताना रिक्षाने पाठीमागून धडक दिली. खोपोली ते चौकच्या दरम्यान जैन साधू यांचे सोबत चालणाऱ्या भक्तगणांचा अपघात झाला. चौक ग्रामीण रुग्णालयात दाखल केले मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला असल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

## निसर्गाची हानी करणे मानवाने टाळावे -संतोष दगडे

**कर्जत : प्रतिनिधी**

निसर्गाचा ऱ्हास म्हणजे मनुष्यजातीचा ऱ्हास हे नक्की आहे आणि त्यामुळे निसर्गाला हानी पोहचवण्याचे कार्य मानवाने थांबवावे, अशी अपेक्षा माउंट एव्हरेस्ट सर करणारे संतोष दगडे यांनी कर्जत येथे जागतिक परिवाराण दिनानिमित्त कार्यक्रमात व्यक्त केली.



अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण महासंघ आणि साहस आऊटडोअर्स तसेच विप्रेड फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्वत दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कर्जत महिला मंडळाचे विद्या विकास मंदिर या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी जागतिक पर्वत दिन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्यावेळी जगातील सर्वात उंच शिखर असलेले माऊंट एव्हरेस्ट सर करणारे गिर्यारोहक संतोष दगडे यांचा महिला मंडळ संस्थेचे वतीने सत्कार करण्यात आला. संस्थेच्या उपाध्यक्ष मीना प्रभावळकर, शाळेच्या मुख्याध्यापिका स्नेहा गाडे तसेच अन्य शिक्षिका यांची या वेळी प्रमुख उपस्थिती होती.

या वेळी संतोष दगडे यांनी विद्यार्थ्यांशी हितगुज करताना पर्वताचे महत्त्व कोणते आणि काय आहे पटवून दिले.विद्यार्थ्यांना पर्वता विषयी माहिती देताना हिमालयातील शिखरे, निसर्ग संवर्धन तसेच डोंगरांमध्ये लागणारे वणवे, त्यांचे उत्खलन, निसर्गाची ह्यामुळे होणारी हानी यावर माहिती सांगण्यात आली. तसेच सर्व मुलांना पर्वत (मराठी लघुपट) ही फिल्म दाखवण्यात आली.

## श्रीवर्धन-अलिबाग बस सुरू करण्याची मागणी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या अलिबाग हे ठिकाण असून त्या मार्गावरील एसटी सेवा बंद करण्यात आली असून, यामुळे प्रवासी वर्गाने ही सेवा तातडीने सुरू करावी, अशी मागणी केली आहे. या गाडीने अनेक वर्षे प्रवाशांना सुविधा पुरवली होती आणि शासकीय कामासाठी जाणाऱ्यांसाठी तो एक अत्यंत सोयीचा मार्ग होता.



श्रीवर्धन येथून सकाळी साडेपाच वाजता सुटणारी ही गाडी मुंबईला जाणाऱ्या प्रवाशांसाठी खूप महत्त्वाची ठरत होती. या गाडीमुळे शासकीय कामांमध्ये गडबड टाळून, प्रवाशी वेळेत अलिबाग पोहोचू शकत होते तसेच संध्याकाळी साडेसहाच्या सुमारास परत श्रीवर्धनला येणारी गाडी शासकीय कामानंतर प्रवाशांना परत श्रीवर्धनला नेण्याचा एक सोयीचा मार्ग होता.

ही गाडी बंद झाल्याने शासकीय कामासाठी अलिबाग मुख्यालयात वेळेवर पोहचण्याच्या अडचणी निर्माण झाल्या आहेत. तसेच, मांडवा फेरीबोटीतून मुंबई गाठण्यासाठी अनेक प्रवाशी आधीची गाडी घेत होते. त्यामुळे, प्रवासी वर्गामध्ये अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत.

प्रवाशांची या बाबतची चिंता लक्षात घेऊन, पेण येथील आगर व्यवस्थापन कार्यालयाने तातडीने श्रीवर्धन-अलिबाग गाडी पुन्हा सुरू करण्याची मागणी स्वीकारून कार्यवाही करावी, अशी सर्वत्र मागणी जोर धरत आहे. वरिष्ठ प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने निर्णय घेतल्यास प्रवाशांची अडचण कमी होईल आणि रेल्वे सेवा पुन्हा सुरळीत होईल. पेण येथील आगर व्यवस्थापन कार्यालयातील वरिष्ठ प्रशासनाने यावर तातडीने निर्णय घेऊन प्रवासी वर्गाच्या समस्या लवकरात लवकर निवारण करावी.

> **सध्या दोन-तीन दररोज गाड्या शालेय सहलीसाठी जात असून, गेल्या वर्षापेक्षा या वर्षी गाड्यांची संख्या कमी आहे. साधारणपणे २० गाड्या ह्या निकामी झाल्या आहेत मुख्य गाडी बंद असल्याने प्रवाशांना अडचणी येत आहे. गाडी सुरू केल्यास शासकीय कामासाठी सोय होईल याची दखल घेत आहोत.**
>
> **-मैहब्बुब मणेर, आगार प्रमुख, श्रीवर्धन**

## वनस्पती उती संवर्धन प्रात्यक्षिके व प्रशिक्षण

**मुरूड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स मुरूड जंजिरा मध्ये प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली वनस्पती शास्त्र व प्राणीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवशीय वनस्पती उती संवर्धन प्रात्यक्षिके व प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन २० ते २२ डिसेंबर २०२४ या कालावधीत करण्यात आले होते.

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यशाळेचे उदघाटन झाले. प्रशिक्षणासाठी प्रशिक्षक म्हणून डॉ. दक्षयिनी सहाय्यक प्राध्यापक अलॉयसिस (डीम टू बी युनिव्हर्सिटी), कर्नाटक यांची लक्षणीय उपस्थिती आहे. सहभागी विद्यार्थ्यांना त्या तीन दिवसामध्ये वनस्पती उती संवर्धन प्रात्यक्षिके व प्रशिक्षण देणार आहेत. या कार्यशाळेत ४० प्रशिक्षणार्थी सहभागी झाले आहेत. सादर प्रशिक्षण कार्यशाळा यशस्वी पूर्ण करण्यासाठी वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख प्रा. रहीम बागवान आणि प्राणिशास्त्र विभागाचे प्रा. जावेद मनियार हे काम पाहत असून सहभागी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.



## रक्तदान शिबिरासह कापडी पिशव्यांचे वाटप

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट, पिल्लई एचओसी कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय मोहोपाडा रसायनी, टाटा मेमोरियल कॅन्सर सेंटर खारघर यांच्या संयुक्त विद्यमानाने रक्तदान शिबिर व कापडी बॅग वाटप शिबिर शुक्रवारी (दि.२०) आयोजित करण्यात आले होते.

या वेळी पन्नासपेक्षा जास्त नागरिकांनी रक्तदान हेच श्रेष्ठ दान समजून रक्तदान केले. या वेळी पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन संस्थेकडून पर्यावरण संरक्षणासाठी प्लास्टीक विरोधात मोहिम राबवून नागरीकांना कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.

या वेळी सरपंच दिपाली नरेश पाटील, उपसरपंच राजेश पाटील, अरुण गोविंद जाधव अध्यक्ष पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट, नरेश पाटील, कलावती उपाध्याय शिक्षिका गौतम कांबळे शिक्षक आदी मान्यवरांसह नागरिक उपस्थित होते.



## विघवली केंद्राच्या क्रीडा व व्यक्तिमत्त्व विकास स्पर्धा उत्साहात

**माणगाव : बातमीदार**

विघवली केंद्राच्या क्रीडा व व्यक्तिमत्त्व स्पर्धा रा. जिं. प. शाळा वारक येथे मोठ्या उत्साहात झाल्या. वारक शाळा व्य. समिती अध्यक्षा मनिषा वारेकर यांच्या हस्ते सरस्वती व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले प्रतिमा पूजन व शिक्षणतज्ज्ञ विजय धसाडे यांच्या हस्ते कार्यक्रमांचे उद्घाटन झाले.



केंद्रप्रमुख उभारे सर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तसेच शाळेचे माजी विद्यार्थी प्रवीण जाधव यांनी खेळाचे महत्त्व अनुभव कथन केले. क्रीडा स्पर्धेत लगोरी, नेमबाजी, लंगडी, दोरी उडी तसेच सांस्कृतिक व कला यात नृत्य, पथनाट्य, समूहगायन व शिल्प स्पर्धा प्रामुख्याने घेण्यात आल्या. केंद्रातील १० शाळांनी यात सहभाग घेतला. यात लहान गट इयत्ता १ ते ४ यामध्ये प्रथम क्रमांक पथनाट्य शाळा विघवली, समुहगायन-कशेणे व पारंपारिक नृत्य विघवली- तसेच लंगडी लहान गट कुशेडे कोशिंबले, कशेने शाळेतील संघाने विजय मिळवला. तसेच मोठा गट इयत्ता पाचवी ते सातवी मोठ्या गटात तिन्ही सांस्कृतिक स्पर्धेत कालवण शाळेने प्रथम क्रमांक पटकावला तसेच वैयक्तीक स्पर्धा शिल्पकला प्रथम क्रमांक लहान गट शाळा कालवण आदि. वाडी व मोठा गट दाखणे, दोरी उडी कशेणे, (लहान गट) (मोठा गट) कालवण तसेच क्रीडा नेमबाजी यात लहान गट शाळा मुठवली निजामपुर व मोठ्या गटात कालवण प्रथम क्रमांक लगोरी, नेमबाजी व लंगडी या क्रीडा स्पर्धेत कालवण शाळेने घवघवीत यश मिळविले. स्पर्धेत उत्तम कामगिरी करणाऱ्या सर्व विदयार्थ्यांना केंद्रप्रमुख यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

स्पर्धेचे सूत्रसंचालन अपूर्वा जंगम यानी केले. तर कालवण शाळेचे मुख्याध्यापक भायदे सर यांनी उपस्थित सर्वाचे आभार व्यक्त केले. या स्पर्धेत केंद्रातील सर्व शिक्षक, माता पालक या सर्वाचे सहकार्य लाभले.

# भारतीय महिला क्रिकेट संघ चॅम्पियन

## बांगलादेशला नमवत आशिया चषक जिंकला

**क्वालालंपूर : वृत्तसंस्था**

१९ वर्षांखालील महिला क्रिकेट संघाने आशिया चषक जिंकला आहे. मलेशियाची राजधानी क्वालालंपूरच्या मैदानात झालेल्या अंतिम सामन्यात भारताने बांगलादेशच्या संघाला ४१ धावांनी पराभूत करत फायनल बाजी मारली. याआधी पुरुष गटातही भारत-बांगलादेश असा फायनल सामना रंगल्याचे पहायला मिळाले होते. त्या वेळी भारतीय संघाच्या पदरी अपयश आले होते, पण महिला संघाने या पराभवाचा वचपा काढत महिला गटातील पहिल्यावहिल्या ट्रॉफीवर आपले नाव कोरले आहे.




अंतिम लढतीत बांगलादेशच्या संघाने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करताना भारताने निर्धारित २० षटकांत सात विकेट्सच्या मोबदल्यात ११७ धावा केल्या. भारताकडून सलामीची बॅटर गोंगाडी त्रिशा हिने ४७ चेंडूत पाच चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने ५२ धावांची दमदार खेळी केली. तिच्याशिवाय भारतीय संघाची कर्णधार निकी प्रसाद २१ (१२) मिथिला विनोद १७ (१२) आणि आयुषी शुक्ला १० (१३) या तिघींनी दुहेरी आकडा गाठला. दुसरीकडे बांगलादेश संघाकडून फरजाना हिने सर्वाधइक चार विकेट्स घेतल्या. निशिता अख्तरच्या खात्यात दोन विकेट्स, तर हबिबा इस्लाम हिला एक विकेट मिळाली.

भारतीय महिला संघाने दिलेल्या ११८ धावांचा पाठलाग करताना बांगलादेश संघातील एकाही फलंदाजाचा निभाव लागला नाही. सलामीवीर फहोमिदा १८ (२४) आणि जैरिया २२ (३०) या दोघींशिवाय एकीलाही दुहेरी आकडा गाठता आला नाही. परिणामी बांगलादेशचा संघ १९व्या षटकातील तिसऱ्या चेंडूवरच ७६ धावांत गारद झाला. भारताकडून आयुषी शुक्ला हिने ३.३ षटकात १७ धावा देत तीन विकेट्स मिळवल्या. सोनम यादव आणि परुनिका सिसोदिया यांनी प्रत्येकी दोन विकेट्स आपल्या खात्यात जमा केल्या, तर व्ही. जे. जोशिथा हिला एक यश मिळाले.

# रायगडातील पालिकांचा पेणमध्ये क्रीडा महोत्सव



**पेण : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील नगर परिषद व नगरपंचायती यांचा क्रीडा महोत्सव पेण पालिकेच्या भव्य मैदानावर २० ते २२ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आला होता. या महोत्सवाचे उद्घाटन जिल्हा नगरविकास शाखा रायगड जिल्हा न.प. प्रशासनाचे शाम पोशट्टी यांच्या हस्ते झाले.

उद्घाटन समारंभास उद्योजक राजू पिचिका, मुख्याधिकारी जीवन पाटील, अजय एडके, पंकज पाटील, वैभव गरवे, धनंजय कोलेकर, विराज लबडे, समीर जाधव, सचिन बच्चाव, राहुल इंगळे, संतोष माळी, रश्मी चव्हाण, धनंजय कोलेकर, विद्या ऐरणकर, मनिषा वंजाळे व इतर मान्यवर उपस्थित होते. पाटील यांनी सर्वांचे स्वागत केले.

जिल्ह्यातील नगर परिषद व नगरपंचायतींचे मिळून ३५० खेळाडू कर्मचाऱ्यांनी विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेत आनंद लुटला.

# कॅरम बॉल टाकत सर्वांनाच बोल्ड केलेस!

## पंतप्रधान मोदींकडून अश्विनला निवृत्तीच्या शुभेच्छा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा आघाडीचा फिरकीपटू रविचंद्रन अश्विन याने ऑस्ट्रेलियाविरुद्ध सुरू असलेल्या कसोटी मालिकेच्या मध्यातच अचानक आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. अश्विनच्या या तडकाफडकी निर्णयाने लाखो क्रिकेट चाहत्यांना धक्का बसला आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अश्विनला पत्र लिहित निवृत्तीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

१४ वर्षे आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अश्विनने अनेकदा भारताला एकहाती विजय मिळवून दिले आहेत. याचबरोबर कसोटी क्रिकेटमध्ये त्याने आपली वेगळी छाप सोडली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविचंद्रन अश्विनला लिहिलेल्या पत्रात त्याच्या अविश्वसनीय कारकिर्दीचे कौतुक केले. याचबरोबर अश्विनच्या फलंदाजांना त्याच्या गोलंदाजीतील वैविध्याने चकवण्याच्या आणि त्यांच्यावर वर्चस्व गाजवण्याच्या क्षमतेचेही कौतुक केले आहे.

प्रिय अश्विन, आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याच्या तुझ्या घोषणेने भारतातील आणि जगभरातील चाहत्यांना आश्चर्याचा धक्का बसला आहे. प्रत्येकजण आणखी अनेक ऑफ-ब्रेकची (ऑफ स्पिन) अपेक्षा करत असताना, तू कॅरम बॉल टाकत सर्वांनाच बोल्ड केले.

अश्विनच्या आंतराष्ट्रीय क्रिकेटमधील विकेट्सविषयी लिहिताना पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, तू सर्व प्रकारच्या क्रिकेटमध्ये घेतलेल्या ७६५ आंतरराष्ट्रीय विकेट्सपैकी प्रत्येक विकेट खास होती. कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक मालिकाविराचे पुरस्कार जिंकत कसोटी संघाच्या यशात तुझे किती योगदान होते हे दाखवून दिले आहे.

# गुड मॉर्निंग स्पोर्टस् संघ बळीराम चषकाचा मानकरी

**मुंबई : प्रतिनिधी**

गुड मॉर्निंग स्पोर्टस् संघाने बळीराम क्रीडा मंडळ आयोजित पुरुष प्रथम श्रेणी गटात जेतेपद पटकावले. याच संघाचा शार्दुल पाटील स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरला. अंतिम सामन्यात प्रतिस्पर्धी लायन्स स्पोर्टस्च्या राज आचार्य याने एकाच चढाईत चार गडी टिपले, पण संघाला पराभव पत्करावा लागला.




५१व्या कबड्डी महोत्सवानिमित्त काळाचौकी आंबेवाडी येथील बळीराम मंडळाच्या पटांगणावर झालेल्या पुरुषांच्या अंतिम सामन्यात गुड मॉर्निंगने लायन्स स्पोर्टस्चा प्रतिकार ४२-३३ असा मोडून काढत रोख रक्कम व बळीराम चषक आपल्या नावे केला. सुरुवात आक्रमक करीत गुड मॉर्निंगने दोन लोण देत पूर्वार्धात १९-१४ अशी आश्वासक आघाडी घेतली आणि उत्तरार्धात आणखी एक लोण देत आपले विजेतेपद निश्चित केले. लायन्सनेदेखील पूर्वार्धात लोणची परतफेड करीत कडवी लढत दिली.

गुड मॉर्निंगने पूर्ण डावात सहा बोनस व एक अव्वल पकड केली, तर लायन्सने पूर्ण डावात सात बोनस गुण करीत सामन्यातील रंगत कायम ठेवली. शार्दुल पाटील याच्या दमदार चढाया, त्याला साहिल राणे, सर्वेश पांचाळ यांची मिळालेली बचावाची भक्कम साथ यामुळेच गुड मॉर्निंगने आपला विजय साकारला. लायन्सच्या राज आचार्यने उत्तरार्धात एकाच चढाईत चार गडी टिपत सामन्यातील चुरस वाढविली. त्याला शुभम मटकरने उत्तम पकडी करीत छान साथ दिली, पण संघाला विजयी करण्यात ते कमी पडले.

या अगोदर झालेल्या उपांत्य सामन्यात लायन्स स्पोर्टस्ने अमर क्रीडा मंडळाला ३६-२६ असे, तर गुड मॉर्निंगने जय भारत संघाला चुरशीच्या लढतीत ३०-२९ असे पराभूत करीत अंतिम फेरीत धडक दिली होती.

गुड मॉर्निंगच्या साहिल राणे आणि लायन्सच्या राज आचार्य यांना स्पर्धेतील अनुक्रमे उत्कृष्ट पकडी आणि चढाईचे खेळाडू म्हणून निवडण्यात आले. सर्व रोख रकमेची पारितोषिके लक्ष्मीबाई ठोंबरे यांच्या वतीने प्रदान करण्यात आली.

लालबागचा राजा मंडळाचे सचिव सुधीर साळवी, माजी नगरसेवक सचिन पडवळ, लक्ष्मीबाई ठोंबरे, जयश्री सुर्वे, स्पर्धा निरीक्षक अनिल केशव, पंच प्रमुख सुनील नवले यांच्या उपस्थितीत स्पर्धेचे बक्षीस वितरण झाले. स्पर्धा यशस्वीतेसाठी बळीराम मंडळाचे पदाधिकारी, सदस्यांनी परिश्रम घेतले.

# दि कैंपोलियन क्लब टी-२० क्रिकेट स्पर्धेला आजपासून प्रारंभ

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए) आयोजित दि कैंपोलियन क्लब टी-२० नॉक-आऊट क्रिकेट स्पर्धेला सोमवारी (दि. २३) रायगड जिल्ह्यातील विविध मैदावर शुभारंभ होत आहे.

रायगड जिल्ह्यातील नामवंत ३२ अकॅडमी, क्लब या स्पर्धेमध्ये सहभागी होणार असून महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए)च्या वतीने घेण्यात येणाऱ्या आंतरजिल्हा निवड चाचणी टी-२० क्रिकेट स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्याच्या संघ या स्पर्धेतून निवडला जाणार आहे. रंगीत कपडे व पांढऱ्या चेंडूवर ही स्पर्धा आयोजित केली आहे.

रायगड जिल्ह्यातील खारघर येथील बी.पी. पाटील मैदान, घरत क्रिकेट मैदान, साईसुरज मैदान, पनवेल येथील ४० प्लस गावदेवी टेंभोडे मैदान व पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणावर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सदस्य समीर मसुरकर यांच्या खोपोली येथील मालकीच्या असलेल्या दि कैंपोलियन क्लब थ्री स्टार हॉटेल रिसॉर्ट यांनी ही स्पर्धा प्रायोजित केली आहे.

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने गेल्या दोन महिन्यात १६, १६ व २३ वर्षाखालील मुलांच्या एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेचे यशस्वी रीत्या आयोजन केले असून आतापर्यंत ११६ एकदिवसीय सामने पूर्ण केले आहेत.

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक यांच्यासह सर्व कार्यकारणीचे पदाधिकारी, सदस्य यांनी सहभागी संघांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# गोव्याच्या विजयात अर्जुन तेंडुलकर चमकला

**जयपूर : वृत्तसंस्था**

विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत गोवा संघाने विजयी सलामी दिली. गोव्याने स्पर्धेतील पहिल्या सामन्यात ओडिशाचा पराभव केला. जयपूरच्या डॉ. सोनी स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात सचिन तेंडुलकरचा मुलगा अर्जुनने अप्रतिम कामगिरी करीत गोव्याच्या विजयात महत्त्वाचे योगदान दिले.



सामन्यात गोव्याने नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी केली. या वेळी गोव्याच्या फलंदाजांनी दमदार कामगिरी करत ५० षटकांत चार गडी गमावून ३७१ धावा केल्या. यात इशान गाडेकरने सर्वाधिक ९३ धावांची खेळी खेळली, तर कर्णधार दर्शन मिसाळने ७९ आणि सुयश प्रभुदेसाईने ७४ धावांचे योगदान दिले. स्नेहल कौठणकरनेही ६७ धावा केल्या. या डावात अर्जुन तेंडुलकरला फलंदाजीची संधी मिळाली नाही, पण लक्ष्याचा बचाव करताना तो संघाचा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला.

गोव्यासाठी अर्जुन तेंडुलकरने गोलंदाजीची सुरुवात केली. सुरुवातीच्या षटकांमध्ये तो खूपच प्रभावी ठरला. दुसऱ्या स्पेलमध्ये त्याला विकेट मिळायला लागल्या. एकामागून एक तीन फलंदाजांना तंबूत पाठवले. अर्जुनने १० षटकांत ६.१०च्या इकॉनॉमी रेटने ६१ धावा दिल्या आणि एकूण तीन बळी घेतले. त्याने कार्तिक बिस्वाल, अभिषेक राऊत आणि राजेश मोहंती यांना बाद केले. अर्जुनशिवाय शुभम तारी आणि मोहित रेडकर यांनीही प्रत्येकी दोन गडी बाद करीत संघाला विजयाकडे नेले.

### दमदार पुनरागमन

सय्यद मुश्ताक अली करंडक स्पर्धेत अर्जुन तेंडुलकरची कामगिरी अत्यंत खराब होती. त्याला एकूण तीन सामने खेळण्याची संधी मिळाली, पण या सामन्यांमध्ये तो फक्त एक बळी घेऊ शकला आणि त्यानंतर तो संघाबाहेर गेला. यानंतर अर्जुन दुबई काही काळ होता. आता त्याने दमदार पुनरागमन केले आहे.

# रायगड जिल्हास्तरीय लेदर क्रिकेट स्पर्धेचा शुभारंभ

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अलिबागमधील सिद्धिविनायक खारपाडा मैदानात अभिजित प्रभाकर राणे क्रिकेट क्लब थळेपाडा आयोजित अर्चना प्रभाकर राणे स्मृती चषक टी-२० लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेस सुरुवात झाली आहे.

आवास ग्रामपंचायतीचे सरपंच अभिजित राणे; त्याचबरोबर आगरसुरेचे माजी सरपंच जगन्नाथ पेढवी, थळेपाडा गावचे ग्रामस्थ विजय भोईर, प्रमोद गावडे, सुभाष थळे, सदानंद थळे, धनंजय थळे, उत्तम थळे, सखाराम थळे यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन झाले. या वेळी रायगड जिल्हा महिला क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक आणि व्यवस्थापक रोहित काळे यांचा विशेष सन्मान करण्यात आला, तर महिला खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी स्पर्धेतील पहिला सामना हा रायगड विरुद्ध खोपोली या महिलांच्या संघामध्ये खेळवला गेला. दोन्ही संघांतील महिला खेळाडूंना सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह देण्यात आले.

सलग आठ दिवस ही स्पर्धा चालणार आहे. स्पर्धेत जिल्ह्यातील १६ नामवंत संघ आपला खेळ दाखवतील. विजेत्या पहिल्या चार क्रमांकांच्या संघांना बक्षीस देण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे वैयक्तिक उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या खेळाडूंना गौरविण्यात येईल. स्पर्धेत पंच म्हणून संदीप जोशी, ऋषिकेश पिंगळसकर; तर समालोचन व निवेदक म्हणून निनाद कदम काम पाहत आहेत. हे सामने पाहण्यासाठी क्रिकेटप्रेमी प्रेक्षकांची मोठी गर्दी झाली आहे.

# स्वच्छ नवी मुंबई हाफ मॅरेथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद

## सहा हजारहून अधिक धावपटूंचा सहभाग; अक्षय पडवळ, सुजाता माने अव्वल

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छतेमधील नवी मुंबईचे मानांकन उंचाविण्याचा निर्धार करीत सहा हजारांहून अधिक नागरिकांनी उत्साहाने सहभागी होत पामबीच मार्गावर आयोजित स्वच्छ नवी मुंबई हाफ मॅरेथॉन उपक्रम रविवारी (दि. २) यशस्वी केला. सकाळी ५.३० वाजता सुरू झालेल्या हाफ मॅरेथॉनमधील २१ किमी अंतराच्या मुख्य गटात महापालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी स्वत: धावपटू म्हणून सहभागी होत नागरिकांसमवेत स्वच्छतेचा संदेश प्रसारित केला. महाराष्ट्र पोलीस दलाच्या फोर्स वनचे प्रमुख कृष्णप्रकाश यांनीही २१ किमी हाफ मॅरेथॉन यशस्वीपणे पूर्ण केली.



सहाय्यक आयुक्त जयंत जावडेकर यांनी २१ किमी तसेच प्रशासन विभागाचे उपायुक्त शरद पवार यांनी १० किमी धाव यशस्वीरित्या पूर्ण केली. अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, शहर अभियंता शरद आरदवाड तसेच अनेक विभागप्रमुखांनी व अधिकारी, कर्मचारीवृंदाने पाच किमी गटात सहभाग घेतला.

२१ किमी, १० किमी आणि ५ किमी गटाप्रमाणेच या हाफ मॅरेथॉनमध्ये १ ते ३ किमीच्या विशेष रनमध्ये १५०हून तृतीयपंथी नागरिक, ५०हून अधिक दिव्यांग, ४०हून अधिक ऑटिझम व्यक्ती, ५०हून अधिक अंध व्यक्ती यांनीही विशेष सहभाग घेतला. याशिवाय अनेक दिव्यांग ५ किमीच्या रनमध्ये सहभागी झाले तसेच काही अंध व्यक्तींनी १० व २१ किमीच्या गटात सहभाग घेतला. ५००हून अधिक शालेय विद्यार्थीही सहभागी झाले होते.

हाफ मॅरेथॉनमध्ये अक्षय पडवळ यांनी २१ किमी अंतर हे १ तास १३ मि. ५४ से. वेळेत पूर्ण करून पुरुष गटातील, तर सुजाता माने यांनी २ तास ४ मि. १२ से. वेळेत पूर्ण करून महिला गटाचे विजेतेपद संपादन केले. १० किमी. अंतराच्या रनमध्ये ओंकार बैकर यांनी पुरुष गटात व कोमल खांडेकर यांनी महिला गटात विजेतेपद पटकाविले. १८ ते ३५, ३६ ते ४५, ४६ ते ५४, ५५ पुढील अशा चार वयोगटांमध्ये पुरुष व महिला प्रत्येक गटात तीन पारितोषिके प्रदान करण्यात आली.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com